रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३००
www.ramprahar.com

रविवार, १८ मे २०२५ ◆ पाने ४० ◆ किंमत ₹२

## रायगड जिल्ह्यात ड्रोन, अन्य हवाई उपकरणांवर बंदी

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात ड्रोन तसेच हवाई उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. भारत सरकारच्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर यशस्वी कारवाई केल्यानंतर संभाव्य बदला घेण्याच्या दृष्टीने दहशतवादी संघटनांकडून ड्रोनचा वापर वाढल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रायगडात १७ मे ते ३ जून या कालावधीत ड्रोन व तत्सम उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी तसेच आजूबाजूच्या परिसरात ड्रोन, रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडिंग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स आणि हॉट एअर बलून यांच्या उड्डाणास सक्त मनाई करण्यात आली आहे. **(सविस्तर वृत्त पान ३७ वर..)**

## अंतरंग

दहशतवादाविरोधात सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना/३

पनवेलमध्ये आंबा महोत्सवाला शानदार सुरुवात/४

शेतकऱ्यांचे उन्हाळी पीक 'अवकाळी'ने हिरावले/५

संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा..
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे ह्याच
वाढदिवसाच्या शुभेच्छा!

18 MAY

मा. सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका

मा.श्री.
परेश ठाकूर

आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!

शुभेच्छुक

FOUNDER : Ramesh Sheth Patil

Zenith
Construction Co.

ASPHALT PLANT & READY MIX CONCRETE PLANT OWNER
(Govt. Registered Contractor)
ISO 9001:2015

Mahesh R. Patil (9323857765)
email:zenithconst.co@gmail.com

**Office :** Shop No. 18. National Complex, Plot No. 118 & 128 Sector-6, Near MTNL Office, New Panel(E)-41028 Te21457879

**PLANT:** Survey No. 49, At. Valvali Village, Po. Navde, Tal. Panvel, Dist. Raigad. Cell 9870399979

विकासाची दिशा व ध्यास असलेले
कणखर आणि खंबीर युवा नेतृत्त्व..!

18 MAY

मा. सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका

# श्री. परेश ठाकूर

आपणांस

वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**Prop. Jaydip Girase**

8668908927/9930348414

**SAI CONSTRUCTION**

**Engineers and Contractor**

Email: jaydipgirase444@gmail.com

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३००
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, १८ मे २०२५ ◆ पाने ४० ◆ किंमत ₹२

# सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचे काम परेश ठाकूर यांनी केले

## भाजप प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे गौरवोद्गार

## पनवेल फुटबॉल लीगचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवा नेते परेश ठाकूर यांचे समाजातील प्रत्येक घटकाबरोबर चांगले नाते असून युवा शक्ती त्यांच्या पाठिशी आहे. सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचे काम परेश ठाकूर यांनी केले असल्याचे गौरवोद्गार भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष व माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी खारघर येथे काढले.

पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते व युवा पिढीचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा खारघरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पनवेल फुटबॉल लीग अर्थात स्थानिक फुटबॉल भव्य पर्वाला शुक्रवारी (दि. १६) शानदार सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी मार्गदर्शन करताना चव्हाण बोलत होते.

उद्घाटन समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, **(पान ४ वर..)**

## दहशतवादाविरोधात भूमिका मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळाची केंद्राकडून स्थापना

**नवी दिल्ली** : पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाविरोधात केंद्र सरकारने सात सदस्यीय सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना केली आहे. या शिष्टमंडळात काँग्रेस नेते शशी थरूर, भाजपचे रविशंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, जेडीयूचे संजय कुमार झा, डीएमकेच्या कनिमोळी, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेनेचे श्रीकांत शिंदे यांचा समावेश आहे. पहलगाम हल्ल्यानंतर उद्भवलेल्या संघर्षाबद्दल हे शिष्टमंडळ जगभरातील प्रमुख देशांचा दौरा करून तेथे भारताची भूमिका मांडणार आहे.

## आयएसआयएसशी संबंधित दोघांना मुंबईतून अटक

**मुंबई** : राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) पुणे येथील आईडी प्रकरणात दोन फरार आरोपींना मुंबई विमानतळावरून अटक केली. हे दोघेही प्रतिबंधित दहशतवादी संघटना आयएसआयएसशी संबंधित आहेत. अब्दुल्ला फैयाज शेख उर्फ डायपरवाला आणि तल्हा खान अशी अटक झालेल्यांची नावे असून ते जकार्ता (इंडोनेशिया) येथे लपून बसले होते आणि भारतात परतण्याचा प्रयत्न करीत असताना पकडले गेले.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी; यूट्यूबरसह सहा जण अटकेत

**हिसार** : पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरविल्याबद्दल सहा भारतीय नागरिकांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये हरियाणाची यूट्यूबर तरुणी ज्योती मल्होत्राचाही समावेश आहे. पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्यांची साखळी हरियाणा आणि पंजाबमध्ये सक्रिय असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले. या प्रकरणी हिसारमधील सिव्हिल लाईन्स पोलिसांनी सहा जणांना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

# विकासकामांचा प्रवाह अविरतपणे सुरू राहील -आमदार प्रशांत ठाकूर

## ■ खारघरमध्ये अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील विविध गृहसंकुलांमधील अंतर्गत रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या वेळी त्यांनी विकासकामांचा प्रवाह अविरतपणे सुरू राहील, अशी ग्वाही दिली. पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आणि पनवेल महापालिकेमार्फत खारघरमधील अनेक रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात येणार आहे.

यामध्ये वास्तुविहार केएच १ आणि केएच २, पारिजात केएच २, घरकुल ए विंग महालक्ष्मी सोसायटी, घरकुल बी विंग कुंजविहार, स्पेगेटी इएफ प्रियदर्शनी सोसायटी, स्पेगेटी एचआय पारिजात सोसायटी, स्पेगेटी जेकेएलएम सोसायटी तसेच वास्तुविहार सेक्टर १६ येथील आरे डेरीपासून साई गणेश मंदिरापर्यंतचा रस्ता, केएच /२ मागील गेटपासून केपीसी स्कूलपर्यंतचा रस्ता आणि सेक्टर १७ मधील दामोदर प्रिया बिल्डिंगपासून सेलिब्रेशन सोसायटीच्या मागील रस्त्याचा समावेश आहे. माजी नगरसेविका संजना समीर कदम यांच्या पाठपुराव्यामुळे या कामांना मंजुरी मिळाली आहे.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर या भूमिपूजन कार्यक्रमाला माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, नरेश ठाकूर, अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, माजी नगरसेविका संजना समीर कदम, रायगड जिल्हा सचिव कीर्ती नवघरे, खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, युवा नेते समीर कदम, अमर उपाध्याय, संदीप माघाडे, अजित अडसुळे, कल्पेश तोडेकर, संतोष शर्मा, प्रभाग अध्यक्ष युवा मोर्चा सुशांत पाटोळे, प्रथमेश मोरे, सर्जेराव मेंगाने, प्रणय मोरे, विश्वनाथ इंडी, रावसाहेब आभाळे, मुकेश गर्ग, राजू आचलकर, महेश हिनुकले, अमित बोदाई, संजय शर्मा, अनिल बोरे, स्नेहल बोधाई, सुनील येवले, सोनू सूर्यवंशी, साहिल कोळी, महेंद्र कांबळे, सुधीर सावंत, आशा मोरे, प्रकाश ओव्हाळ, तसेच सोसायट्यांचे अध्यक्ष, सचिव आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी केक कापून परेश ठाकूर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

यांनी भारतीय जनता पक्ष आणि पनवेल महानगरपालिका नागरिकांना अधिक सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी भारतीय जनता पक्षाची ताकद नागरिकांना सुविधा देण्यासाठी उपयोगात येत असून, नागरिकांच्या अपेक्षित असलेली सर्व कामे लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला.

# जांभिवली आणि भोकरपाडा येथील शेकाप, ठाकरे गटातील कार्यकर्ते भाजपत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपमध्ये पक्ष प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. पक्षाच्या समक्ष नेतृत्वावर विश्वास ठेऊन उरण मतदार संघातील जांभिवली आणि भोकरपाडा येथील शेतकरी कामगार पक्ष आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील प्रमुख पदाधिकारी तसेच विद्यमान ग्रामपंचाय सदस्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

सर्व प्रवेश कर्त्यांचे उरणचे आमदार महेश बालदी यांनी स्वागत करुन त्यांनी जो विश्वाश ठेऊन पक्षात प्रवेश केला आहे तो सार्थ ठरवणार, अशी ग्वाही दिली. पनवेल शहरातील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्ष प्रवेशावेळी जांभिवली येथील शेकापचे जयंता कोंडीलकर, विद्यमान ग्रामपंछायत सदस्या जान्हवी कोंडीलकर, हरिच्छंद्र वाघ, अंकिता पाटील, भास्कर तांबोळी, उबाठा गटाचे काळूराम माळी, चंद्रकांत कोंडीलकर, तसेच भोकरपाडा येथील उबाठा गटचो गिरीष पाटील, लक्ष्मण पाटील, शेकापचे भास्कर निर्गोसे, गार्गी पाटील, दिपा निर्गोसे, कांचन पाटील, कमळ पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहिर पक्ष प्रवेश केला.

या कार्यक्रमाला आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे, कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, साई ग्रामंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल, दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील, किरण माळी, अविनाश नाताडे, विजय मुरकुटे, कर्णा शेलार, मंगेश लबडे, प्रफुल्ल पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी माजी सरपंच विद्याधर मोकल यांच्या वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला असून आमदार महेश बालदी यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

# पनवेलमध्ये आंबा महोत्सवाला सुरुवात : सांस्कृतिक, मनोरंजनात्मक कार्यक्रमासह कोकणी मेव्याची पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात प्रथमच तीन दिवस आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला असून, या महोत्सवाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली आहे. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पक्ष पनवेल शहरच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटल समोरील गुजराती शाळेच्या मैदानावर सुरू झालेल्या या महोत्सवाचे उद्घाटन प्रमुख मान्यवर शकुंतलाताई ठाकूर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले.

या महोत्सवाच्या निमित्ताने महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. उदघाटनाच्या दिवशी महिलांसाठी 'खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी' हा विशेष कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने या वेळी महिलांनी मनमुराद आनंद लुटला. यासोबतच महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी 'अभंग रिपोस्ट' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच रविवार १८ मे रोजी संगीत, नृत्य व कलेचा

संगम असलेला 'वारसा संस्कृतीचा' हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला जाणार आहे. या महोत्सवात खवय्यांसाठी विविध प्रकारच्या आंब्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. तसेच, कोकणचा अस्सल स्वाद अनुभवण्यासाठी कोकण मेवाही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

दरम्यान, या महोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सदिच्छा भेट देत महोत्सवाचे कौतुक केले. या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, ममता प्रीतम म्हात्रे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक राजू सोनी, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा, संजय भगत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, माजी नगरसेविका सुशीला घरत, हेमलता म्हात्रे, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, सारिका भगत, डॉ. सुरेखा मोहोकर, पुष्पलता मढवी, नीता माळी, रेणुका मोहोकर, स्वाती कोळी, संजीवनी खिल्लारे, कोमल कोळी, अंजली काणे, सपना पाटील, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी आदींची उपस्थिती होती.

आयोजक माजी नगरसेविका रुचिता लोंढे, पनवेल मंडल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

## निवडक

### अपघातात दुचाकीस्वार जखमी

**पनवेल :** कारचा दरवाजा अचानक उघडल्याने त्याला मोटरसायकलची धडक बसून दुचाकीस्वार काशिनाथ माने (वय ५७) जखमी झाले. या अपघातप्रकरणी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. काशिनाथ सुदाम माने हेरंब सोसायटी येथून मोटरसायकल (एमएच ०६ एडी ४८३७) वरून पनवेल मार्केटला जात होते. या वेळी पांढरी स्विफ्ट डिझायर कार (एमएच ४३ बीएक्स ७९३८) ही रस्त्याच्या कडेला उभी करून चालकाने स्विफ्ट कारचा दरवाजा अचानक उघडला. या वेळी माने हे मोटरसायकलसह दरवाजाला धडकले आणि खाली पडले. यात त्यांच्या खांद्याला आणि उजव्या गुडघ्याला दुखापत झाली. याप्रकरणी कलीम मोबीन खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### 'रोटरी'च्या कॉलेजचे सुयश

**उरण :** शहरातील रोटरी एज्युकेशन सोसायटीच्या रोटरी इंग्लिश मिडियम हायस्कुल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲन्ड कॉमर्स, बोरी-उरण हया कॉलेजेचा इयत्ता दहावी मार्च २०२५ चा निकाल १०० टक्के लागला आहे. निकाल लागल्याबद्दल रोटरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विकास महाजन, उपाध्यक्ष जगदिश पाटिल, सचिव यतिन म्हात्रे, सह. सचिव. शेखर म्हात्रे, खजिनदार प्रसन्नाकुमार, विश्वस्त डॉ.बी. व्ही. देवणीकर, नरेंद्र पडते व सर्व सभासदांनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षक वर्गाचे अभिनंदन केले.

# 'सीकेटी'तील एनसीसी गर्ल्स कॅडेट्सकडून प्रशिक्षण शिबिर यशस्वी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एनसीसी गर्ल्स कॅडेट्ससाठी बी.के. बिर्ला कॉलेज, कल्याण येथे २ ते ११ मे असा दहा दिवस वार्षिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणात सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागातील एनसीसीच्या सर्व कॅडेट्सनी सहभाग घेतला होता.

या प्रशिक्षणास गर्ल्स कॅडेट्ससह स्नेहा पाटील (केअर टेकर ऑफिसर) उपस्थित होत्या. शिबिराचे उद्घाटन शिबिराचे कमांडर मेजर एस. के. शेखावत यांनी केले. या शिबिरासाठी बटालियन पी आय स्टाफ GCI बस्वती चौधरी मॅडम आणि सर्व ANO आणि CTO उपस्थित होते.

या दहा दिवसांच्या प्रशिक्षणात सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना रनिंग, व्यायाम, योग आणि ड्रिलचे प्रशिक्षण देण्यात आले. परेडचेदेखील आयोजन करण्यात आले होते.

या वेळी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्तंभ लेखन स्पर्धेमध्ये सीकेटीतील आस्था म्हात्रे आणि आर्या पवार यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच सीकेटीतील प्रशिक्षणार्थ्यांनी नृत्य स्पर्धेतदेखील प्रथम क्रमांक पटकावला. सांगता समारंभात सदर प्रशिक्षणार्थ्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी कमांडर मेजर एस के. शेखावत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार मानले व शेवटी NCC गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग १९, म्हात्रे हॉस्पिटल आणि साई अमृत वास्तुरंग या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी सपना पाटील, सोनाली महाडीक, प्रदीप सुतार, मंदा राऊत आदी उपस्थित होते.**

# ट्रेलरला डंपरची धडक; चालक गंभीर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील टी पॉईंटच्या ओव्हर ब्रीजवर पळस्पेकडॅन् मुंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभ्या करून ठेवलेल्या ट्रेलरला पाठीमागून आलेल्या डंपरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात डंपर चालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

ट्रेलर (एमएच-०१-ईएम-४९१७) वरील चालक जावेद अली साजात अली याने रस्त्याच्या डाव्या बाजूला हयगयीने अविचाराने सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत ट्रेलर उभा करून ठेवला असताना पाठीमागून आलेल्या डंपर (एमएच-४७-बीवाय-१६४९) वरीलचालक महेश महातो याची धडक ट्रेलरला बसल्याने या अपघातात चालक महेश महातो हा गंभीर जखमी झाला आहे. या अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना झाले, परंतु उभ्या ट्रेलरच्या आतमध्ये डंपर घुसल्याने चालक महेश महातो हा अडकला होता व तो गंभीररित्या जखमी झाला होता.

तेथील पोलिसांनी त्वरित पनवेल अग्नीशमन दलाच्या पथकाला घटनास्थळी पाचारण केले व अथक प्रयत्नाने महेश महातोला बाहेर काढून त्याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पान ३ वरून

# सामाजिक कार्यासह क्रीडा क्षेत्राची उंची वाढविण्याचे काम परेश ठाकूर यांनी केले

खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, माजी नगरसेवक अनिल भगत, हरेश केणी, गणेश कडू, पापा पटेल, अभिमन्यू पाटील, शत्रुघ्न काकडे, नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, युवा नेते हॅप्पी सिंग, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, वासुदेव पाटील, समीर कदम, दीपक शिंदे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रवीण बेरा, माजी सरपंच संजय घरत, महिला मोर्चा शहर अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा शहर अध्यक्ष नितेश पाटील, संतोष शर्मा, संध्या शारबिद्रे, वासुदेव घरत, अभिषेक भोपी, तेजस जाधव, अजिंक्य नवघरे, अक्षय सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खारघरमधील सेक्टर ७ येथील पं. दीनदयाळ उपाध्याय मैदानावर ही स्पर्धा होत असून विजेत्या संघाला ५० हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला २५ हजार व चषक आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये व चषक असे मुख्य बक्षिसांचे स्वरूप आहे.

परदेशात फुटबॉल प्रीमिअर लीग खेळली जाते. ती स्पर्धा लहान आयोजनातून उत्तरोत्तर मोठी झाली आणि या स्पर्धेचा जगभर नावलौकिक झाला. आपल्या देशात विशेषतः हा खेळ क्रिकेटप्रमाणे जास्त खेळला जात नाही, पण शारीरिक व्यायाम व तंदुरूस्तीच्या बाबतीत हा खेळ गणला जातो. या खेळाची आवड तरुणाईमध्ये निर्माण होण्यासाठी पनवेल फुटबॉल लीगच्या माध्यमातून प्रयत्न होत आहे. तरुणांना प्रोत्साहन देणारा आणि एकोपा निर्माण करणारा हा खेळ असल्याने या खेळाचाही प्रसार व प्रचार झाला पाहिजे आणि स्थानिक फुटबॉलपटूंना व्यासपीठ मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून लीगचे आयोजन करण्यात आले आहे.

या लीगमध्ये खारघर किंग, तळोजा टायटन्स, कळंबोली वॉरिअर्स, कामोठे नाईट्स, पनवेल सिटी फुटबॉल क्लब, पनवेल पॅन्थर, न्यू पनवेल युनायटेड, खांदा कॉलनी स्ट्रायकर्स या आठ संघाचा आणि नामवंत खेळाडूंचा भरणा आहे. ही स्पर्धा केवळ खेळापुरती मर्यादित नाही, तर तरुणांना खेळाकडे वळविणारा एक स्तुत्य उपक्रम ठरत आहे. उद्घाटन समारंभात आठ संघाच्या मालकांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी परेश ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला. ते पुढे म्हणाले की, निरोगी शरीर सर्वात मोठी संपत्ती आहे. तरुणांनी व्यसनाधीन होऊ नये यासाठी स्वामी विवेकानंद यांनी मैदानी खेळाकडे वळण्याचा कायम आग्रह धरला. युवाशक्ती पुढे जाण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाज्वल राष्ट्रप्रेम आणि क्रीडा क्षेत्राला महत्त्व दिले. परेश ठाकूर आणि टीम सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे. त्या अनुषंगाने खेळाडू आणि खेळाला मान-सन्मान देण्याचे काम केले जात आहे. या क्रीडानगरीचा देखावा राष्ट्रीय स्पर्धांप्रमाणे आहे. तरुणांना आकर्षित करणारा हा क्रीडा महोत्सव असून अशा दर्जेदार उपक्रमातून आणि सामाजिक सेवेतून परेश ठाकूर यांचे कार्य नेहमीच अधोरेखित झाले आहे, असे सांगतानाच परेश ठाकूर यांच्यावर असलेल्या प्रेमापोटी दरवर्षी मी वाढदिवसाला येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार विक्रांत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पनवेल शहराचा विकास झाला पाहिजे हा दृष्टिकोन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा कायम राहिला आहे. सभागृह नेते म्हणून आम्ही त्यांच्याबरोबर सभागृहात काम केले, तेव्हा त्यांचा विकासाचा दृष्टिकोन जवळून बघितला आहे. एखादा विषय हाती घेतल्यावर विचार करून फक्त आदेश देऊन सोडायचे नाही, तर विषय पूर्ण होईपर्यंत त्याच्यावर सातत्याने पाठपुरावा करायचा पिंड परेश ठाकूर यांचा राहिला आहे. त्यामुळे विषय पूर्णत्वास नेण्याची मानसिकता अधिकारीवर्गाचीही असते. मन लावून काम करणारा नेता म्हणून परेश ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते. पनवेलच्या पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे काम त्यांनी केले. त्याचबरोबर युवाशक्तीला विविध सामाजिक उपक्रमातून पुढे आणण्याचे कामही त्यांनी यशस्वीपणे केले आहे. परेश ठाकूर यांच्या शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील योगदानाचाही उल्लेखही आमदार विक्रांत पाटील यांनी करीत समाजसेवेचा वसा अखंड चालू राहण्यासाठी त्यांना उदंड आयुष्य लाभो, अशा शब्दांत शुभेच्छा दिल्या.

भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा वाढदिवस म्हणजे विविध सामाजिक उपक्रमांची पर्वणी असते. पनवेल महापालिकेचे नेतृत्व त्यांनी ज्या पद्धतीने केले आहे ते वाखाण्याजोगे आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी महापालिका हद्दीत विकासाचा आलेख उंचावला. परिसरातील विकासकामे करण्याबरोबरच जनतेच्या समस्या सोडवण्याचे काम ते करीत आले आहेत. फक्त अधिकाऱ्यांना सांगणेच नाही, तर त्या विषयाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचे काम ते करतात. केंद्र असो की राज्य भाजपच्या वतीने दिलेला प्रत्येक कार्यक्रम युवा नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होत असतो. त्यांच्या कामाची पद्धत ही उत्तम आणि सामाजिक तळमळ असणारी आहे. त्यामुळे आगामी पनवेल महापालिकेचा महापौर म्हणून परेश ठाकूर यांना आम्हाला पहायचे आहे, असेही अविनाश कोळी यांनी या वेळी म्हटले.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, पनवेल विधानसभा क्षेत्रात क्रीडा क्षेत्राला प्राधान्य देण्याचे काम होत आहे आणि त्यासाठी भारतीय जनता पक्ष रायगड आणि युवा मोर्चा सक्रियतेने काम करीत आहे. विशेषत्वाने आमदार प्रशांत ठाकूर यांचे या विषयाकडे लक्ष असते. ते नेहमी सामाजिक कार्यासोबतच क्रीडा क्षेत्राला महत्त्व देत असतात. खेळ आणि खेळाडूंचा विकास होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केला जात आहे. मागील वर्षी अशाच प्रकारे माझ्या वाढदिवसानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते तसेच नमो चषकचे सलग दोन वर्षे आयोजन करून नवोदित खेळाडूंना व्यासपीठ मिळवून देण्यात आले असून एक लाखाहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेऊन ही स्पर्धा उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात यशस्वी केली होती. भाजपने जेव्हा जेव्हा असे कार्यक्रम दिले ते यशस्वी करण्याचे काम केले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शारीरिक आणि मानसिक समाधान मिळत असल्याने क्रीडा क्षेत्राकडे तरुणाई वळत आहे, असे सांगत माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांची क्रिकेट अकादमी पनवेलमध्ये सुरू झाली आहे. अशाच प्रकारे पनवेल महापालिका हद्दीत विविध ठिकाणी क्रीडा संकुल आणि मैदान विकसित करण्याचे काम हाती घेण्यात येत असल्याचीही माहिती परेश ठाकूर यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने दिली. प्रास्ताविक युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी केले.

**संघ आणि मालक**

खारघर किंग्स् : भाजप खारघर, तळोजा टायटन्स : नितेश बाळकृष्ण पाटील, कामोठे नाईटस् : विकास घरत व विजय चिपळेकर, कळंबोली वॉरिअर्स, खांदा कॉलनी स्ट्राईकर्स : संज्योत शेळके, नवीन पनवेल युनायटेड : ॲड. मनोज भुजबळ, पनवेल सिटी एफसी : यतिन देशमुख, पनवेल पॅन्थर्स : प्रमोद भिंगारकर व राजेश पाटील.

# उन्हाळी भातशेतीचे नुकसान

## ◆ शेतकऱ्यांचे पीक 'अवकाळी'ने हिरावले
## ◆ नुकसानभरपाई देण्याची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पुगाव, मूठवली बुद्रुक व खांब गाव आदी परिसरात मोठ्या प्रमाणात उन्हाळी भात शेती केली जाते. हमखास पाणी, पोषक वातावरण, शेतीची योग्य मशागत आणि हवामानाची साथ यामुळे उन्हाळी भात शेती मधून शेतकऱ्यांना हुकमी पिक व उत्पन्न मिळते, मात्र अवकाळी पावसामुळे हे हुकमी पीक पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. सध्या येथे पाण्याने भरलेल्या शेतात भात कापणीची व झोडणीची कामे सुरू आहेत.

काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांची उन्हाळी भात शेतीच्या कामांची लगबग सुरु होती. टपोऱ्या भाताच्या लोंब्या डोलू लागल्या होत्या. त्यामुळे

हाती भरघोस पीक लागणार यामुळे शेतकरी सुखावले होते. मात्र ऐनवेळी अवकाळी पावसाने घात केला आहे.

नाईलाजाने भिजलेला भात शेतकऱ्यांना कापावा लागत आहे. या भाताला भावदेखील मिळणार नाही. तसेच पेंढा भिजल्याने पेंड्यालादेखील भाव मिळणार नाही. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

**अवकाळी पाऊस पडल्याने शेतामध्ये पाणी साठले. हाती आलेले भातपीक पूर्णपणे भिजले आहे. त्यामुळे ते खराब झाले आहे. त्याला भावदेखील मिळणार नाही. तब्बल २५ ते ३० हजारांचे नुकसान झाले आहे. शासनाने याची दखल घेऊन ताबडतोब पंचनामा करावा व नुकसान भरपाई द्यावी.**

**-चंद्रकांत यशवंत येळकर, शेतकरी, पुगाव, रोहा**

### हुकमी पीक पाण्यात!

***हमखास पाणी, पोषक वातावरण, शेतीची योग्य मशागत आणि हवामानाची साथ यामुळे उन्हाळी भात शेती मधून शेतकऱ्यांना हुकमी पिक मिळते. पावसाळ्यातील शेतीतून मिळणाऱ्या उत्पादन व उत्पन्ना पेक्षा उन्हाळी शेतीतून अधिक चांगले उत्पादन व उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकरी समाधानी असतात. काही शेतकरी तर पावसाळ्याऐवजी उन्हाळी शेती करण्यासच प्राधान्य देतात, मात्र यंदा अवकाळी पावसाने उन्हाळी भात शेतीचे मोठे नुकसान केले.***

# 'केंद्र सरकारच्या ११ योजनांचा लाभ आदिवासी बांधवांना देणार'

**रोहा : प्रतिनिधी**

ओएनजीसीच्या सीएसआर निधीतून रोहा तालुक्यातील श्रीवर्धन मतदार संघातील ८०० आदिवासी बांधवांना सौर कंदील देण्यात येत आहे. उर्वरित तालुक्यातील अन्य भागातील आदिवासी बांधवांना सौर कंदील लवकरच देण्यात येईल यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. केंद्र सरकारच्या आदिवासी बांधवांसाठी ११ योजनांचा लाभ आदिवासी बांधवांना मिळवून देणार असल्याचा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

पंचायत समिती रोहा येथे आदिवासी कुटुंबांना सौर कंदील वाटप कार्यक्रम प्रसंगी खासदार सुनील तटकरे बोलत होते. या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी बारामतीच्या धरतीवर त्याप्रमाणे दुसरी पंचायत समिती रोहा येथे बांधण्यात येणार असल्याचे सांगितले.

आदिवासींसाठींच्या योजना रोहा तालुक्यात सर्वच आदिवासी बांधवांपर्यंत पोहचण्यासाठी लवकरात अधिकारी वर्गांची बैठक घेऊन या योजना कशा पोचतील यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. यासाठी भारत सरकार कडून १०० टक्के निधी उपलब्ध करून देणार असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केले.

माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, जिल्हा सरचिटणीस नंदकुमार म्हात्रे, माजी उपसभापती रामचंद्र सकपाळ, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विनोद पाशीलकर, कार्याध्यक्ष समिर शेडगे, जयवंत मुंढे, सरपंच रामाशेठ म्हात्रे, राजेंद्र पोकळे, महेंद्र गुजर, नरेश पाटील, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, नायब तहसीलदार राजेश थोरे आदि उपस्थित होते.

आतापर्यंत श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील चार ही तालुक्यात वाटप करण्यात आले. पावसाळी वातावरण सुरु होत असल्याने विज खंडीत होत असताना आज रोहा तालुक्यात वाटप होत आहे.केंद्र सरकारचे विविध योजना आदिवासी बांधवांना मिळावे यासाठी माझी तटकरे साहेबांना विनंती आहे की आपण लक्ष देऊन या योजना आदिवासी बांधवांना मिळावे यासाठी प्रयत्न करावे, असे सांगितले. सूत्रसंचालन जयेश भोईर तर आभार सहाय्यक गटविकास अधिकारी महादेव शिंदे यांनी मानले.

# माथेरान टपाल विभागाची ड्रोनसेवा सुरू होणार

### पहिली चाचणी यशस्वी

**माथेरान, नेरळ : प्रतिनिधी**

उंच गिरीशिखरावर वसलेल्या माथेरान पर्यटनस्थळी तसेच कर्जत तालुक्यातील डोंगराळ व दुर्गम भागात टपाल विभागामार्फत पार्सल सेवा जलद गतीने मिळावी याकरिता टपाल विभागाने मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.आता टपाल विभागाकडून ड्रोन सेवा सुरू करण्यात येणार असून

ही पहिली चाचणी प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरात करण्यात आली. एकावेळी ९.८ किलो पार्सल माथेरानमधून ड्रोनद्वारे पाठवण्याची चाचणी शुक्रवारी (दि.१६) सायंकाळी करण्यात आलीअसून ही चाचणी यशस्वी झाली आहे.

पूर्वीच्या काळात पोस्टमन आपले पार्सल आणि पत्र घेऊन येत असायचे मात्र आताच्या जलद युगात पोस्ट सेवा जलद गतीने करण्यासाठी ड्रोनद्वारे पार्सल घेऊन जाण्याची टेक्नॉलॉजी सुरू होणार आहे. माथेरानमध्ये टपाल विभागाकडून ड्रोन चाचणी घेण्यात आली. या वेळी माथेरानमधून कर्जत टपाल विभागाला ड्रोनद्वारे पार्सल पाठवण्यात आले. ड्रोनद्वारे हे काम अवघ्या १५ मिनिटांत पूर्ण झाले. अशीच चाचणी शनिवारीदेखील १७ मे रोजी केली जाणार आहे. प्रसिद्ध माथेरान पर्यटनस्थळी टपाल विभागाकडून तत्पर

सेवा मिळावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. एकावेळी २० किलो पार्सल घेऊन जाण्याची क्षमता असलेल्या ड्रोन द्वारे ९.८ किलो वजनाचे पार्सल कर्जत येथील टपाल विभागाला या वेळी पाठवण्यात आले.

या सुविधेमुळे भविष्यात माथेरानमध्ये टपाल विभागाचे पार्सल ड्रोन द्वारे येणार आहे. कुरिअर सेवेला टक्कर देण्यासाठी दूरसंचार विभागाने ड्रोनचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटनस्थळ असलेले माथेरान मुंबईपासून हवाई अंतराने काही मिनिटांवर आहे, मात्र रस्ते मार्गाने काही तास लागतात. त्यामुळे ८०० मीटर उंचीवर असलेल्या माथेरानमध्ये टपाल खात्याकडून ड्रोन सेवा देण्याचा विचार सुरू आहे. यासाठीच माथेरानमध्ये ड्रोन किती उंच उडू शकते, ते किती वजन पेलू शकते याची चाचणी दूरसंचार विभागाने शुक्रवारी सायंकाळी केली.

यासाठी कर्जत-चौक मार्गालगत असलेल्या टेकडीवरील कर्जतमधील ग्रीन व्ह्यू हॉटेलवरून हे ड्रोन उडवण्यात आले आणि केवळ १५ मिनिटात हे ड्रोन माथेरानमध्ये पोहचले. कर्जत ते माथेरान अंतरासाठी रस्तेमार्गे दीड तास लागतो तिथे ड्रोनने अवघ्या १०० सेकंदात कर्जत ते माथेरान प्रवास केला.माथेरान पोस्ट ऑफिस समोरील फन टाईम रेस्टॉरंटसमोरून कर्जत साठी ड्रोन उडवण्यात आले. त्यातून ९ किलो ८०० ग्रॅम वजनाचे पार्सल पाठवण्यात आले. ड्रोन १५ मिनिटांत कर्जत पोस्ट ऑफिसमध्ये पोहचला. दोन्ही बाजूंनी चाचणी यशस्वी झाल्यानंतर दूरसंचार निगम यांच्या कडून जल्लोष करण्यात आला.आता भविष्यात काही पार्सल येणार असेल तर माथेरान वासीयांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या पहावयास मिळणार आहेत.

**धाटाव : रोहा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष तथा रोह्याचे माजी नगराध्यक्ष समीर शेंडगे यांना वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे, सरचिटणीस विजय मोरे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# मध्य रेल्वेचा पर्यावरणपूरक उपक्रम; १७०.७ कोटी रुपयांची बचत

**रोहे प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने, ऊर्जा कार्यक्षमता आणि पर्यावरणीय शाश्वततेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात ८६.७१ टक्के हेड-ऑन जनरेशन (एचओजी) परिचालन प्रभावीपणे साध्य केले आहे. या उल्लेखनीय प्रगतीमुळे पर्यावरणीय मंजुरी आणि ऑपरेशनल खर्चात अंदाजे १७०.७ कोटी रुपयांची बचत झाली आहे.

हेड-ऑन जनरेशन (एचओजी) ही एक आधुनिक वीज पुरवठा प्रणाली आहे जिथे लोकोमोटिव्हद्वारे ओव्हरहेड इलेक्ट्रिक लाईन्स (ओएचई) मधून थेट वीज घेतली जाते आणि वातानुकूलित, प्रकाशयोजना आणि इतर विद्युत गरजांसाठी ट्रेनच्या डब्यांमध्ये वितरित केली जाते. ही नाविन्यपूर्ण प्रणाली पारंपारिक एंड-ऑन जनरेशन (ईओजी) पद्धतीची जागा घेत आहे, जी ट्रेनला जोडलेल्या डिझेल-चालित जनरेटर कार वर अवलंबून असते.

ईओजी च्या विपरीत, ज्यामध्ये ट्रेनच्या दोन्ही टोकांना दोन डिझेल जनरेटर कारची आवश्यकता असते, एचओजी लोकोमोटिव्हमधून अखंडपणे वीज घेते, ज्यामुळे जनरेटर कारची आवश्यकता कमी होते, डिझेलचा वापर कमी होतो आणि हानिकारक उत्सर्जन कमी होते. एचओजी मध्ये बदल केल्यामुळे रेल्वेमध्ये काम शांत, स्वच्छ आणि अधिक कार्यक्षम ट्रेन ऑपरेशन होतात. विभागनिहाय बचत पहाता मुंबई विभाग १३६.१६ कोटी रुपये, पुणे विभाग २२.३१ कोटी रुपये, नागपूर विभाग ६.९६ कोटी रुपये, सोलापूर विभाग ३.६८ कोटी रुपये, भुसावळ विभाग १.५९ कोटी रुपये एवढा झाला आहे.

एचओजी ची लक्षणीय बचत आणि परिचालन फायदे केवळ खर्चाच्या कार्यक्षमतेत योगदान देत नाहीत तर देशाच्या पर्यावरणीय आणि ऊर्जा उद्दिष्टे साध्य करण्यात भारतीय रेल्वेची महत्त्वाची भूमिकादेखील अधोरेखित करतात.

# यंदा पावसाळ्यात समुद्राला १८ दिवस मोठी भरती

* २६, २७ जूनला सर्वात मोठे उधाण
* पाच मीटर उंचीच्या लाटा उसळणार

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवर यंदा पावसाळ्यात १८ दिवस समुद्राला मोठी उधाणं (भरती) येणार आहेत. त्यामुळे या काळात साडेचार मीटर हून अधिक उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. २६,२७ जूनला पावसाळ्यातील सर्वात मोठी भरती कोकणवासियांना अनुभवता येणार आहे.

दरवर्षी पावसाळ्यात समुद्राला मोठी उधाण येत असतात. या उधाणांचा किनारपट्टीवरील भागांना बरेचदा तडाखा बसत असतो. त्यामुळे पावसाळ्यापूर्व समुद्राला येणाऱ्या संभाव्य मोठ्या भरतीचे अंदाजपत्रक आपत्ती व्यवस्थापन विभागा मार्फत जाहीर केले जाते. या दिवशी मच्छीमारांना तसेच किनारपट्टीवरील नागरिकांना सतर्कतेचे आदेश दिले जात असतात.

यावर्षी पावसाळ्यात १८ दिवस मोठी उधाण येतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात जून मधील पाच, जुलै मधील चार, ऑगस्ट मधील पाच, आणि सप्टेंबर मधील चार दिवसांचा समावेश आहे. या दिवशी समुद्राला साडे चार मीटर पेक्षा अधिक मोठी भरती येणे अपेक्षित आहे. २६ जूनला ४.७५ मीटर, २७ जूनला ४.७३ मीटरची भरती कोकण किनारपट्टीवर अनुभवता येणार आहे. या पार्श्वभूमीवर समुद्र, खाडी तसेच नदी किनऱ्यावरील गावांना स्थानिक पातळवीर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यात नदी, खाडी आणि समुद्र किनाऱ्यावर एकूण ३८५ गावे आहेत. या गावांना स्थानिक पातळीवर नियोजन करण्याबाबतचे आदेश रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिले आहेत.

### उधाणाचा काय परिणाम होतो?

***या कालावधीत उधाणांचे पाणी किनारपट्टीवरील भागात शिरण्याची शक्यता असते. समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे शेतात खारेपाणी शिरून जमीन नापीक होऊ शकते. सखल भागात पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. याच कालावधीत अशातच मोठा पाऊस झाल्यास, पाण्याचा निचरा होण्यास अडसर होतो. ज्यामुळे नद्या, नाल्यांना पूरदेखील येऊ शकतो.***

### मोठी भरती असलेले धोक्याचे दिवस

**जून महिन्यात २४ ते २८**
**जुलै महिन्यात २४ ते २७**
**ऑगस्ट महिन्यात १० ते १२ आणि २३,२४**
**सप्टेंबर महिन्यात ८ ते ११**

# विन्हेरे-पुणे एसटी बसला अपघात; सात जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील विन्हेरे महाड राज्य मार्गावर बीजगर गाव हद्दीत विन्हेरे ते पुणे जाणारी एसटी बस घसरून रस्त्यात उलटली. या अपघातात पाच प्रवासी एसटी चालक आणि वाहक मिळून एकूण सात जण गंभीर जखमी झाले आहेत. या सर्व जखमीवर उपचार सुरू आहेत.

विन्हेरे स्वार्गेट १५ प्रवासी घेऊन विन्हेरे वरून २:५० वाजता पुणे कडे निघालेली एसटी बस (एमएच १४ बीटी ४७७५) ही महाड तालुक्यातील बिजगर या गाव हद्दीत आल्या नंतर चालकाचा बस वरून ताबा सुटला आणि बस रस्त्यावरच घसरली. या अपघातात खैरुन्निसा अहमद देवळेकर (वय५५, रा. भोमजई महाड), निशी सुनील घाडगे (वय ९, रा. रूपवली महाड), सुजाता सुरेश यादव (वय ४९, रा. विन्हेरे), सुरेश धाकू यादव (वय ६०, रा. विन्हेरे), धनश्री सुरेश यादव (वय २७, रा. विन्हेरे), चालक मुरलीधर दिगंबर पोफळे (वय ३६, रा. भेकरेनगर पुणे), वाहक जयश्री बाबू वाघमारे (वय ४१,रा. सिंहगड पुणे) एकूण सात प्रवासी जखमी झाले. या सर्व जखमीन वरती महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची नोंद महाड तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अवकाळी पावसानंतर आठ दिवसात या मार्गावर आणि एकाच ठिकाणी हा दुसरा अपघात आहे. अगोदर टेम्पो आणि मिनिडोर रिक्षामध्ये अपघात होऊन आठ प्रवासी जखमी झाले होते.

# पनवेलमध्ये आज भव्य तिरंगा यात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानमधील दशहतवादी अड्डे उध्वस्त करून पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवला. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ राष्ट्रीय एकता आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ पनवेल भाजपतर्फे रविवारी (दि.१८) सकाळी ९ वाजता 'भव्य तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

या तिरंगा पदयात्रेला पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरुवात होणार आहे. यामध्ये नागरिकांनीही सहभागी व्हावे असे आवाहन भाजपतर्फे करण्यात आले आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com




WITH BEST COMPLIMENTS FROM

Eagle
Infra India Ltd.

कणखर आणि खंबीर युवा नेतृत्त्व..!

माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका

18 MAY

श्री. परेश ठाकूर

आपणांस

वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

WITH BEST COMPLIMENTS FROM

Zenith Sports

Sr. No. 165/A2, Anand Housing Society, Dhom Colony Road, Songirwadi, Tal, Wai-412803 (Dist-Satara)

Email-zenithsportwai@gmail.com /zenithsportwai@yahoo.com/zenithsportspvtltd@gmail.com
Mobile-7709165486/9975960786,

संकल्प असावेत नवे तुमचे मिळाव्यात त्यांना नव्या दिशा..
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे ह्याच वाढदिवसाच्या शुभेच्छा!

18 MAY

# मा. सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका

मा.श्री.

# परेश ठाकूर

आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!

शुभेच्छुक

# S. S. Electrical Works

Electrical Engineers & Govt. Licenced Contractor

23, Archies Co. Op. H. Soc. Ltd., Oak Baug, Station Road, KALYAN (W) - 421 301.

वारसा लोकहिताचा,
चेहरा नव्या पिढीचा..!
18
MAY
मा. सभागृह नेते,
पनवेल मनपा
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
WITH BEST COMPLIMENTS FROM
Sai Ganesh Enterprises
GOVT. CIVIL GONTRACTOR, SWEEPER,
CLINICAL LABOUR SUPPLIER
Office: S-10, Jivdani Niwas, Chandersh Lodha Marg, Gala Nagar, Achole
Road, Nallasopara (E), Palghar - 410209

व्यक्तिमत्त्व असं दिवसेंदिवस खुलणारं,
प्रत्येक दिवस नवं क्षितिज शोधणारं...
असं अफाट उत्साही व्यक्तिमत्त्व...

पनवेल महानगर पालिका
मा. सभागृह नेते

श्री. परेश ठाकूर

18 MAY आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !

शुभेच्छुक

SHREE KRISHNA ENTERPRISES

Govt. License Electrical & Civil Contractor,
Building Material & Water Suppliers

Asudgaon, Near Ram Mandir, Post. Kalamboll, Tal. Panvel,
Dis. Raigad, Navi Mumbai-410 206
Email: sanjyotbhal@gmail.com

Prop.: Sanjyot B. Shelke (9323265997)

तरुणाईची क्रेझ पनवेल शहराची दमदार इमेज!

माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका

# श्री. परेश ठाकूर

आपणांस
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

18 MAY

WITH BEST
COMPLIMENTS
FROM

VSC

निलेश पाटील जितेश म्हात्रे राकेश पोटे

VASTU SHILP CONSTRUCTION

Govt. Regd. Contractor

Shop No-7, Shree Krushna Kutir Apt., Momin Pada, Panvel 410 206, Raigad.

**मानसिक क्षमतेच्या क्षेत्रात चाळीस वर्षापेक्षाही अधिक काळ कार्यरत असणारे तसेच प्रसिद्ध लेखक बॉब प्रॉक्टर म्हणतात, 'तुम्ही कोणत्याही शहरात असा मला खात्री आहे, तुमच्या शरीरात इतकी शक्ती आहे की तुम्ही तुमचे शहर एक आठवडाभरात प्रकाशित करू शकता.' पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर सातत्याने युवकांना प्रेरित करतात. त्यांना ऊर्जा देण्याचे काम करतात. 'साथी हाथ बढाना, एक अकेला थक जाए तो मिलकर हाथ बटाना...'**

# बहुआयामी व्यक्तिमत्त्व

कार्यकर्त्यांचा एक समूह त्यांनी तयार केला. उत्कृष्ट व्यवस्थापक म्हणून ते काम करतात. आपल्याला जेवढं मिळते त्याहून जास्त देण्याची सवय, सुखद व्यक्तिमत्त्व सहानुभूती, सहयोग, सर्वांची अर्थात आपल्या समर्थकांची जबाबदारी घेण्याची इच्छा, अविचल साहस, आत्मनियंत्रण, निर्णय घेण्याची क्षमता, कठीण परिश्रम, प्रयत्न, सातत्य, उत्तम विचार, वेळेचे अचूक नियोजन, वक्तशीरपणा, समतोल बुद्धी, अनुकंपा, धैर्य, सचोटी, सहानुभूती, नम्रता, निष्ठा, सभ्यता आणि शिष्टाचार हे लीडरशिपचे, नेतृत्व करणाऱ्यांचे प्रमुख गुण आहेत.

परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या कोशिश फाऊंडेशनच्या माध्यमातून पनवेल शहरात ऑक्सिपार्क साकारण्यात आले आहे. त्याचबरोबर ठिकठिकाणी सातत्याने वृक्षारोपण करून पर्यावरणाचे जतन व संवर्धन केले जाते. खारघरमधील पांडवकडा येथे परेश ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पनवेलमधील वाहनतळ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने कार्यान्वित झाले.

कोशिश फाऊंडेशनच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, फोटोग्राफी स्पर्धा, सूर्यनमस्कार, घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा सातत्याने आयोजित करण्यात येतात. गायकांना व्यासपीठ मिळावे याकरिता पनवेल शहरातील प्रसिद्ध वडाळे तलाव या ठिकाणी सूर पनवेलचा कार्यक्रमांतर्गत मैफल भरवण्यात येते.

पनवेल व उरणच्या वतीने उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मैदानावर अर्थात लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडा नगरीत भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत व या स्पर्धेचे मुख्य आयोजक परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाले.

डॉ. गजानन श्री. खैर म्हणतात, 'क्रिकेट, टेनिस, हॉकी, फुटबॉल, कबड्डी, खो-खो अशा कोणत्याही खेळाचे सामने असले तरी कळत न कळत तेथे गीतेतील तत्त्वज्ञानाचा प्रत्यय येतो, कारण गीता ही रणांगणावरच सांगितली आहे. ती क्रीडांच्या, युद्धाच्या, संसाराच्या, राजकारणाच्या, समाजकार्याच्या सर्वच क्षेत्रात उपयोगी पडते इतकी व्यापक आहे. गीतेचा समत्ववृत्तीचा संदेश जीवनात हरघडी उपयोगी पडतो.' महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील यांची सर्वधर्मसमभावाची कल्पना व समत्ववृत्ती हा गीतेचा संदेश परेश ठाकूर यांनी अनेक कार्यक्रमांद्वारे आपणा सर्वांना दिला आहे.

युवा पिढीत खेळाची रूची वाढावी यासाठी परेश ठाकूर खेळाडूंना नेहमी प्रोत्साहन देतात. गुणवंत खेळाडू तयार व्हावेत यासाठी ते प्रयत्नशील असतात. पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, माजी मनपा सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून तसेच तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख, विद्यमान आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रशासकीय अनुभवातून नवीन पनवेल येथे महापालिकेच्या माध्यमातून साकारलेल्या दिलीप वेंगसरकर संचलित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाले. बॅडमिंटन आर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते रायगडच्या विजेत्या बॅडमिंटन संघातील खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. टीआयपील रोटरी प्रीमियर लीगचे बक्षीस वितरण परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंचा उत्साह वाढवला व आयोजकांचे कौतुक केले.

परेश ठाकूर प्रत्येक व्यक्तीशी सारख्याच आदराने वागतात. महान नेतृत्वाची छाप त्यांच्या आदरयुक्त वागण्यामुळे पडते. शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, व्यावसायिक व सामाजिक वर्तुळात ते सहजपणे आणि आत्मविश्वासाने वागतात. बदलत्या पद्धती, प्रथा, आधुनिक तंत्रज्ञान जाणून घेतात. मित्रांमध्ये आत्मविश्वासाने वावरतात. नव्या शक्यतांना त्यांनी ओळखलं, त्यांना जाणून घेतलं. नवीन नवीन व पनवेल शहराच्या दृष्टीने उपयुक्त योजना राबविल्या. पनवेलचे रस्ते, उद्याने व तलावांच्या सुशोभिकरणासाठी, व्यायामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेतला. असामान्य-कर्तृत्ववान परेश ठाकूर यांनी महापालिकेत अनेक संकल्प केले, ते पूर्णत्वास नेले. आपल्या नवनवीन कल्पना मोठ्या धाडसाने राबविल्या.

विचारवंत म्हणतात, 'जीवनात परिवर्तन घडवावयाचे असेल तर लगेच सुरुवात करा आणि प्रत्येक काम धडाडीने करा.' दुसऱ्याला मदत करण्याची प्रवृत्ती, कष्ट, परिश्रम, शिष्टाचार पालन, नम्रता, धैर्य, चिकाटी, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन यामुळे आयुष्याला अर्थ प्राप्त होतो, यश मिळते. आत्मविश्वास, साहस, धाडस यामुळेच परेश ठाकूर उत्कर्षाच्या, प्रगतीच्या, यशाच्या, सन्मानाच्या दिशेने पुढे जाताना आपण पाहतो. हाती घेतलेले काम आनंदाने, मनापासून, जास्तीत जास्त चांगलं व परिपूर्ण करण्याचा ते प्रयत्न करतात.

म्हणूनच पनवेलचे लोक त्यांना मान-सन्मान देतात, यशस्वी नेता मानतात.

पनवेलकरांच्या मनात त्यांच्याबद्दल स्नेहभावना, आदर आहे.

आपले कार्यकर्ते, आपले समर्थक, अनुयायी हीच आपली खरीखुरी संपत्ती असते. त्यामुळे त्यांना भेटणाऱ्या प्रत्येक माणसाशी आरोग्य, सुख आणि समृद्धीच्या गोष्टी परेश ठाकूर करतात. प्रसन्न व्यक्तिमत्त्व असणाऱ्या, चारित्र्यसंपन्न असणाऱ्या व्यक्ती शिष्टाचार पाळतात. त्यांच्या शब्दांमध्ये खूप मोठी ताकद असते. ही सर्वांना प्रेरित करते. यामुळे माणूस अशक्य गोष्टी शक्य करतो.

'प्लीज', 'थँकू', 'हस्तांदोलन', 'स्मितहास्य' या गोष्टीही अत्यंत आवश्यक आहेत. धन्यवाद, आभारी आहे, होय, वाहवा, सुंदर, अभिनंदन हे शक्य आहे, हे साध्य होईल, आपण फार चांगले आहात, नवीन तंत्रज्ञानाची, वस्तुची माहिती मी घेईन, हे यश माझे एकट्याचे नाही, आपल्या सर्वांचे आहे, या सौजन्यदर्शक शब्दांचा, वाक्यांचा वापर आपोआपच त्यांच्याकडून होतो.

पनवेलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी आणि स्वत:च्या प्रयत्नाने पुढे आलेले हे नेतृत्व आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'जग अधिक चांगले, सुंदर करण्यासाठी हातभार लावण्याची संधी मला जेव्हा जेव्हा मिळेलं, तेव्हा ती संधी मी गमावता कामा नये.'

जॉर्ज बर्नार्ड शॉ म्हणतात, मी सुखी आहे की दु:खी, नशीबवान आहे की कमनशिबी याचा विचार करू नये. उठायचं आणि कामाला लागायचं. आपण सुखी होऊ.

परेश ठाकूर यांचा वर्तमानकाळ प्रयत्नवादी आहे. त्यामुळे त्यांचं भविष्यही उज्ज्वल आहे. तेजराज जैन यांनी लिहिलेले एक मुक्तक अत्यंत प्रसिद्ध आहे.

'यूँ ही यष-सौरभ से महके,
जीवन का हर पल
विघ्न-बाधाएँ निकट न आएँ,
हो हर काम सफल,
करते हैं हम प्रार्थना,
परमपिता परमेश्वर से
ले नित नयी बधाई आए,
हर आनेवाला कल'

परेश ठाकूर यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**-प्रा.डॉ. विजयकुमार रणदिवे,**

# पाठिशखा!

माझे परममित्र परेशशेठ आणि माझी मैत्री म्हणजे कृष्ण आणि सुदाम्यासारखी आहे. परेशशेठ यांना उद्योगपती दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांचा वारसा लाभला आणि मला एक रिक्षाचालकाचा मुलगा म्हणून वारसा लाभला, पण आमच्यामधील मैत्री आजही घट्ट आहे.

कोणत्याही प्रकारचा श्रीमंत आणि गरीब असा भेदभाव मला आजवर कधीच परेशशेठ यांच्याकडून जाणवला नाही. ज्याप्रमाणे रामशेठ ठाकूर दानशूर आहेत, त्याचप्रमाणे परेशशेठ हे एक दिलदार मित्रदेखील आहेत आणि परेशशेठ यांचे मोठे भाऊ सन्माननीय आमदार प्रशांत ठाकूर साहेब मला गुरूवर्याप्रमाणे आहेत.

परेशशेठ आणि माझ्या मैत्रीला ३० वर्षे पूर्ण झाली. १९९५पासून मी परेशशेठसोबत आहे आणि माझ्यासारख्या एक गरीब कुटुंबातील मुलाला ठाकूर परिवाराचा सहवास मिळाला, हे मी माझे भाग्य समजतो.

मी १९९५ साली एएससी कॉलेजला अकरावी सायन्समध्ये प्रवेश घेतला. त्या वेळी माझी परेशशेठ यांच्याबरोबर मैत्री झाली. कॉलेजमध्ये असताना परेशशेठ यांचे वडील सन्माननीय लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब हे खासदार होते. त्यामुळे पूर्ण कॉलेजमध्ये परेशशेठ यांची एक वेगळी ओळख होती. कॉलेजमध्ये ते त्या वेळी यामाहा आरएक्स १०० या मोटरसायकलने यायचे आणि मी सायकलने जायचो. तेव्हा यामाहा आरएक्स १०० गाडी म्हणजे युवावर्गासाठी फेमस गाडी होती. मी सहज त्यांना बोललो शेठ मला गाडी चालवायला द्याल का? त्या वेळी त्यांनी कोणताही विचार न करता लगेच मला गाडीची चावी दिली. मला एवढा आनंद झाला आजही मिळते, पण त्या वेळची आठवण म्हणून त्यांनी आता एक पॉर्श गाडी घेतली आणि त्या गाडीला १३१४ नंबर घेतला. मी लगेच बोललो, शेठ कॉलेजमध्ये असताना तुमच्या गाड्यांचा नंबर १३१४ होता. हा झाला गाड्यांचा विषय.

परेशशेठ आज युवकांचे प्रेरणास्थान म्हणून ओळखले जातात, कारण ते नेहमी युवकांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असतात. असच मी कॉलेजमध्ये असताना पूर्ण डेअरींगमध्ये रहायचो. कधी घाबरत नसे, कारण माझ्या पाठिशी एक डॅशिंग मित्र उभा होता हे मला माहीत होते. माझ्या सुखदु:खात ते माझ्यासोबत उभे राहिले.

कालांतराने २८ नोव्हेंबर २०२४ रोजी माझ्या वडिलांचे निधन झाले. त्या वेळी परेशशेठ सांत्वनासाठी माझ्या घरी आले आणि मला भेटून मिठी मारली आणि बोलले तू काळजी करून नकोस. तुला काहीही मदत लागली तरी नि:संकोचपणे मला सांग. मी पूर्णपणे तुझ्या पाठिशी आहे. असा मित्र मला लाभला हे मी माझे भाग्यच समजतो. माझी मैत्री अजुन घट्ट होत गेली. नंतर मी त्यांच्यासोबत कार्यकर्ता म्हणून काम करत होतो. ते सांगतील ते काम करायचो. कधी एसटी बसमध्ये प्रचाराचे स्टिकर लावणे, पँप्लेट वाटणे अशी पक्षाची कामे करायचो.

सन २००४ साली माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शेकापमधून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. तेव्हाही त्यांच्यासोबत काम करू लागलो. त्या वेळी मी सुमो गाडी टुरिस्ट म्हणून चालवायचो. २ मार्च २००५ रोजी एचआयएल कंपनीमध्ये आंदोलन होते. त्या वेळी परेशशेठ यांनी माझ्या गाडीत कार्यकर्ते घेऊन यायला सांगितले होते. एका ट्रकमध्ये एकता श्रमिक संघ युनियन बार्ड होता व तो बोर्ड त्या एचआयएल कंपनीच्या युनियनच्या गेटवर लावायचा होता, पण तो ट्रक पुढे मध्येच बंद पडला. मग मला परेशशेठनी गाडी घेऊन बोलाविले. मी कोणताही विचार न करता गाडी घेऊन आलो व ट्रकमधील मोठा बोर्ड माझ्या सुमो गाडीच्या वर कॅरियरला बांधला. मला एक युनियन लिडर नाना चोरघे यांना माझ्या टाटा सुमो गाडीत बसवले. मी ती गाडी हळूहळू पुढे घेत गेलो. पुढे मोठा पोलीस बंदोबस्त होता, कारण त्या वेळचे मुख्यमंत्री सन्माननीय विलासराव देशमुखसाहेब यांनी पोलिसांना सूचना दिल्या होत्या की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या युनियनचा बोर्ड कंपनीच्या गेटवर लागला पाहिजे. त्या वेळी शेकाप विरुद्ध काँग्रेस असा संघर्ष चालू होता. त्यामुळे भांडणाचे वातावरण होते, पण कोणताही विचार न करता मी पूर्ण डेरिंगमध्ये गाडी पुढे घेत गेलो. एचआयएल कॉलनीच्या येथे माझी गाडी अडवली आणि गाडीसमोर शेकापच्या भरपूर महिला कार्यकर्त्या येऊन रस्त्यावर बसल्या व घोषणाबाजी चालू झाली. इतक्यात एका शेकाप कार्यकर्त्याने माझ्या गाडीवर मोठा दगड मारला व गाडी फोडली. मग पोलिसांनी बंदुकीतून अश्रूधुराच्या कांड्या सोडल्या. मी न घाबरता गाडी पुढे घेऊन निघालो आणि कंपनीच्या गेटवर जाऊन स्वत: बोर्ड उतरवून लावला. बोर्डाला हार घातला आणि बाहेर आलो. त्या वेळी माझ्या गाडीवर सन्माननीय आमदार प्रशांत ठाकूरसाहेब उभे राहिले आणि झेंडा हाता घेऊन आनंद व्यक्त करत होते.

मग पनवेल येथे पक्ष कार्यालयात सर्व कार्यकर्ते जमले. माझी संपूर्ण व्हिडीओ शुटींग छायाचित्रकार बाळू जुमलेदार यांनी काढली होती. ती शुटींग रामशेठ ठाकूरसाहेब यांना दाखवली. त्यांना माझी डेअरिंग बघून आनंद झाला व मला कार्यकर्ते खांद्यावर घेऊन शेठकडे घेऊन गेले. त्या वेळी त्यांनी माझे खूप कौतुक केले आणि बोलले की, परेश या अमरिशच्या गाडीचे झालेले पूर्ण नुकसान भरून दे आणि त्याची गाडी उद्यापासून टोलनाक्यावर लाव. मला रामशेठ ठाकूरसाहेबांनी त्यांच्या पक्ष कार्यालयात कामाला लावले. तेव्हापासून माझे पक्षात सक्रिय काम करण्यास सुरुवात झाली. हा प्रसंग तेव्हाचा, जेव्हा माझ्या वडिलांचे निधन होऊन तीन ते चार महिनेच झाले होते, पण फक्त परेशशेठ यांच्याबरोबर घट्ट मैत्री होती म्हणून त्यांचा कोणताही शब्द टाळत नव्हतो, कारण मला माहीत होते ते माझ्या पाठिशी खंबीरपणे उभे असतात.

कालांतराने परेशशेठ यांच्याबरोबर अधिक जोमाने काम करत गेलो. परेशशेठ यांनी पॅन थंडर बाईक रायडर ग्रुप चालू केला. त्यात मला सदस्य बनवून घेतले. प्रत्येक ठिकाणी बाईक राईड असल्यावर ते मला सोबत घेऊन जात असत. त्यात हिमाचल प्रदेश येथील सिटी व्हॅली ही माझी सर्वात मोठी राईड झाली. ती राईड मी पनवेलपासून सुरुवात करून परत पनवेल येथे पूर्ण केली. त्या वेळी त्यांनी माझे भरपूर कौतुक केले. मी तेव्हा नवीन ३५० क्लासिक बुलेट घेतली होती व ती घेऊन गेलो होतो.

कालांतराने भाजपमध्ये प्रवेश झाला, तेव्हापण त्यांच्यासोबत मी सक्रिय काम करत असे. त्या वेळी पक्ष प्रचारात बाईक रॅली काढण्यात येत असे. परेशशेठ रॅलीची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपवत असत.

ठाकूर परिवार हा एक महासागराप्रमाणे आहे. या महासागरात अनेक जण पोहण्यास उडी मारतात. मला मिळालेल्या या संधीचा कोणताही गैरफायदा न घेता त्यांच्यासोबत एकनिष्ठ, प्रामाणिकपणे व मेहनतीने काम करत आहे, कारण मला माझ्या वडिलांची शिकवण होती की, जीवनात मेहनतीने काम कर, प्रामाणिकपणे काम कर आणि कोणतेही काम लहान समजू नकोस. या शिकवणीमुळे ठाकूर परिवाराची कोणतीही बदनामी होईल अशी वर्तणूक आजपर्यंत माझ्याकडून झाली नाही आणि यापुढेही होणार नाही.

लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब, आमदार प्रशांत ठाकूरसाहेब, परममित्र परेशशेठ ठाकूर हे माझ्या प्रत्येक सुखदु:खात सहभागी होतात व त्यांचे उपकार मी जीवनभर फेडू शकत नाही.

माझे परममित्र परेशशेठ यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा! ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो. त्यांचे आरोग्य उत्तम राहो व अशीच जनसेवा त्यांच्या हातून घडत राहो अशी ईश्वराकडे प्रार्थना!!

**-अमरिश मोकल,** चिटणीस,
भाजप उत्तर रायगड जिल्हा

# उमदे नेतृत्व

**दूरदृष्टी**, कणखर नेतृत्व, प्रगतशील विचारांचा झरा, आधुनिकतेच्या माध्यमातून विकास सामाजिक बांधिलकीचे वारसदार आणि विद्यार्थ्यांसाठीची असणारी असामान्य तळमळ या बाबी रयत शिक्षण संस्थेच्या शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवेचे विद्यमान चेअरमन व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते, युवा नेतृत्व परेश रामशेठ ठाकूरसाहेब यांना बहुआयामी व्यक्ती बनवतात. आपल्या विचारांत सुस्पष्टता, कार्यात प्रामाणिकपणा, सोबत चपळता आणि प्रत्येक निर्णयामागे सामाजिक जाणीव हीच परेश ठाकूरसाहेबांची खरी ओळख आहे.

एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व, संयमी शिस्तप्रिय, प्रत्येक काम हे वेळेत आणि तितक्याच उत्तम दर्जाचे व्हावे ही भावना आणि करूणा यांचा सुंदर संगम म्हणून परेश ठाकूर यांच्याकडे स्कूलचे प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक, पालक पाहतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्कूलचे काम हे अत्यंत चोख चालू आहे. काळोख्या रात्रीच्या पदरात काजवा बनून चंद्रताऱ्यांना लाजवील असे आकाश सजवणारे तुम्ही, सागरातल्या शिंपल्यांना आपल्या विचार देऊन त्यांच्यात मोती निर्माण करणारे तुम्ही, जमिनीवर उभे राहून आकाशाकडे बघणाऱ्यांना आकाश कवेत घेण्याचे सामर्थ्य देणारे तुम्ही, वाऱ्याची दिशा बदलू शकणारे तुम्ही, स्वप्नांना, साकार होशील असं सांगणारे तुम्ही, दुसऱ्यांच्या स्वप्नात आपली स्वप्ने शोधणारे तुम्ही, आमचा आदर्श आमची प्रेरणा तुम्ही साहेब. आपल्याला आयुष्यात उत्तम आरोग्य, सुख, समाधान आणि यश लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

युवा नेतृत्व परेश रामशेठ ठाकूरसाहेबांना शाळेच्या मुख्याध्यपिका मुक्ता भानुदास खटावकर, स्कूलचे सर्व शिक्षकवृंद व शिक्षेकेतर कर्मचारी यांच्याकडून वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा..!

**-मनीषा मोरे, हर्षल फडके**

# व्हिजन असलेला नेता

पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेशदादा ठाकूरसाहेब आम्हाला भावाप्रमाणे मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या बहूमुल्य मार्गदर्शनानेच खारघरमध्ये आम्ही विकास करू शकलो.

परेशदादा छोट्या छोट्या गोष्टी आम्हाला समजून सांगत असतात. त्यांचा जो कामाचा अनुभव आहे तो वापरून खारघरमधील मैदान, प्लेग्राउंड रोड, आरोग्यविषयी सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असतात. पक्षाचा प्रोटोकॉल पाळणारे हे व्यक्तिमत्व आहे. मला त्यांच्यातली आवडणारी गोष्ट म्हणून युवा पिढीसाठी पुढाकार घेऊन अनेक मोठ्या मोठ्या स्पर्धांसाठी ते बारकाईने लक्ष देतात. मग ती मॅरेथॉन असेल, क्रिकेट स्पर्धा असेल, हिल ट्रेकिंग असेल त्यांचे प्रत्येक स्पर्धा, उपक्रमामध्ये योगदान असते आणि वैयक्तिक लक्ष असते. स्वतः ग्राउंड लेव्हलवर ते मेहनत करतात आणि आम्हाला प्रोत्साहित करतात.

सर्वांना सोबत घेऊन चालणारे परेशदादांचे व्यक्तिमत्व आहे. सर्व नगरसेवक, पदाधिकारी यांना सोबत घेऊन विविध कामे तसेच इलेक्शन कॅम्पिंग असेल त्यात प्रत्येकाचे मत ऐकूनच ते निर्णय घेतात. शिवाय सर्वांना मत मांडण्याची संधी देतात. नागरी विषयांकडे त्यांचे विशेष लक्ष असते. पावसाळापूर्व कामे असतील, नालेसफाई त्याचाही आढावा घेतात.

Toll Booths
Porta Cabins
Portable Buildings
www.rdcabin.com
E-mail : sales@rdcabin.com / rdcabin@gmail.com

18 MAY
मा. सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
प्रविण पाटील
अध्यक्ष, खारघर मंडल भाजपा
माजी सभापती, स्थायी समिती
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका

मा. सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
श्री. नितेश पाटील
युवा नेता, भारतीय जनता पार्टी
श्री. अभिमन्यु धर्मा पाटील
मा. सभापती, प्रभाग समिती 'अ'
मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका

मा.सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
किरण पां. भोईर
पनवेल, कोळीवाडा

18 MAY
मा.सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
भारतीय जनता पार्टी कोन व पदाधिकारी, ग्रामस्थ मंडळ, कोन, ता. पनवेल.
निलेश म्हात्रे (मा. सरपंच, कोन)
दिपक म्हात्रे (भाजपा कार्यकर्ते)

18 MAY
मा. सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
SAI PRINTERS
innovative printing brilliant result
Print WORLD
•print•copy•design•digital
Mob. No.: 9987291017/9773361003/8082082082/9870370307
Off. 1: At. Kopar, Post. Gavhan, Tal. Panvel, Dist Raigad.
Off. 2: 401, NMS Icon, Plot No. 194, Sector-19, Ulwe, Navi Mumbai.
Email: sai.printers15@gmail.com/printworld.ulwe@gmail.com

मा.सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
विकासाची दिशा व ध्यास असलेले कणखर आणि खंबीर युवा नेतृत्त्व..!
शुभेच्छुक
भारतीय जनता पार्टी
निलेश म. बावीस्कर
मा. सभापती, नगरसेवक, पनवेल महानगरपालिका

मा. सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
अजय तुकाराम बहिरा
मा. स्थायी समिती सदस्य, मा. नगरसेवक, पनवेल महानगरपालिका (प्र. क्र. २०, पनवेल)
श्रेयश तुकाराम बहिरा

अभीष्टचिंतन
मा. सभागृह नेते
पनवेल महानगर पालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!
Best Wishes From...
JIGNESH PANCHAL
(Mob.: 999 865 41 40)
NU BHOOMI ENTERPRISE
(ISO 9001-2015 Certified Company)
Plot No. 185, Road No.4, KATHWADA G.I.D.C, Ahmedabad. 382430, INDIA.

मा. सभागृह नेते, प.म.पा.
श्री. परेश ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
SHREE ENTERPRISES
All Type of Rock Cutter, Concrate Cutter, JCB Braker, Bucket, Tractor Compressor & Soil Excavation
Add.: At.Post. Pargaon Dapoli, Tal. Panvel - 410 206, Dist.Raigad

मा.सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा!
शुभेच्छुक
ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ
मा. नगरसेवक : पनवेल महानगर पालिका
मा. सभापती : सार्वजनिक बांधकाम, विकास व नियोजन समिती
अध्यक्ष : पनवेल वकील संघटना
प्रदेश निमंत्रित सदस्य : भारतीय जनता पार्टी
संयोजक महाराष्ट्र : ओ.बी.सी. मोर्चा (Head Quarter Delhi) रीसर्च अँड पोलिसी
उपाध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश भाजप ओ.बी.सी मोर्चा
उपाध्यक्ष (संघटन) : अ.भा. अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा

Happy Birthday
To Mr. Paresh Thakur
Best wishes on your Birthday.
Wishing you another year of great accomplishments!
With best compliments from
CALCUTTA DOZER HOUSE
- STOCKISTS AND DEALERS IN -
SPARES FOR DOZERS, EXCAVATORS & OTHER HEMM
1 Sprocket Segments 2 Carrier Roller 3 Track Chain 4 Track Link 5 Track Roller 6 Track Shoe
35 CHITTARANJAN AVENUE, 1ST FLOOR, ROOM # 10, KOLKATA - 70012
MOBILE: 9830039391 / 9830873816
Email: caldoz7983@gmail.com GSTIN: 19AAEFC5884G1Z5

18 MAY
मा.सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका
परेश ठाकूर
आपणांस वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
Vaibhav Thakur B.E. (Mech)
Mob. : 9930573057
Info@ompowersystem.com
Tushar Thakur D.E.E.
Mob. : 9594388899
www.ompowersystem.com
Office : 9619505152
वैभव ठाकूर
तुषार ठाकूर
OMS
OM POWER SYSTEM
AN ISO 9001 : 2008 CERTIFIED COMPANY
Government Registered Contractor
Complete Solution For Your Electrical, Fabrication & Civil Work, Fabrication Works - Industrial Shed, Structural Fabrication, Building Turnkey Projects Electrical Work - Industrial Wiring, H.T./L.T., MSEDCL Power Sanctioning etc.
Office Address : 102, R. Residency, Plot- 39, Sec-19, Behind Hotel Malwan Tadka, Ulwe Node, Navi Mumbai - 410 206

जीवेत् शरद: शतम्!
सी.एच.भरणीकुमार
(ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. संचालक)
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक: धनंजय करुतुरी
(ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. संचालक)

जीवेत् शरद: शतम्!
योगेश कुलकर्णी
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : महादेव यादव

नव्या दिशाने, नव्या विचाराने, पाउल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने, तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!

**मा. सभागृह नेते,**
**पनवेल महानगरपालिका**

# मा.श्री. परेश ठाकूर

आपणांस
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा!

WITH BEST COMPLIMENTS FROM

**GURUJI**
INFRASTRUCTURE PVT LTD

विकासाची **दिशा व ध्यास** असलेले
कणखर आणि **खंबीर युवा नेतृत्त्व..!**

**माजी सभागृह नेते,**
**पनवेल महानगरपालिका**

# श्री. परेश ठाकूर

आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!

WITH BEST COMPLIMENTS FROM

**SAINIK**
**INTEGRATED & SECURITY PRIVATE LIMITED**

व्यक्तिमत्त्व असं दिवसेंदिवस खुलणारं,
प्रत्येक दिवस नवं क्षितिज शोधणारं...
असं अफाट उत्साही व्यक्तिमत्त्व..!

मा. सभागृह नेते
पनवेल महानगर पालिका
मा. श्री. परेश ठाकूर

आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !

CCB
M/s. CHANDRAKANT C. Bhoir
Government Registered Contractors, Earth Movers,
Transport & Civil Contractors

Mr. Chandrakant Bhoir
+ 91 98332 33315

Mr. Vishal Bhoir
+ 91 87793 96970

At & Post - Nhava,
Tal. Panvel,
Dist. Raigad,
Navi Mumbai - 410 206.
vishalbhoir11@gmail.com





मा. सभागृह नेते, प.म.पा.
मा.श्री. परेश ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !

शुभेच्छुक
C R Infra

मा. सभागृह नेते
पनवेल महानगर पालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्री. दत्ता रुकमाजी केंद्रे
श्री बालाजी ट्रान्सपोर्ट
भाजपा, वाहतूक सेल अध्यक्ष रायगड जिल्हा
भाजपा प्रणित संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना
सचिव महाराष्ट्र राज्य

श्री. निलेश पाटील
एकविरा ट्रान्सपोर्ट
अर्थ मुव्हर्स, बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
शिवम आर्केड, शॉप नं.२०, प्लॉट नं.
१७६/१८३, से.१०,नवीन पनवेल (पू.)

मा. सभागृह नेते, प.म.पा.
मा.श्री. परेश ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा !

शुभेच्छुक
श्री. प्रमोद घरत
श्री. तुळशीराम घरत
सान्वी एंटरप्रायजेस
मु. ओवळे, पो. पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६
मोबाईल : ९८३३६८९०८९

मा. सभागृह नेते, प.म.पा.
श्री. परेश ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !

शुभेच्छुक
BHAWANI ELECTRICAL
Hardware & Paints
Dealers In : Anchor Electrical, Asian Paints, Hardware, Polycab Wire,
Plumbing & Sanitaryware
ANCHOR | POLYCAB WIRES & CABLES | asianpaints
Shop No. 6, Trimurthi Arcade, Uran Naka, Panvel 410206
Mob. 9969627289 / 9619323678

तरुणाईची
क्रेझ पनवेल
शहराची
दमदार इमेज!

मा. सभागृह नेते
पनवेल महानगर पालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा !

शु
भे
च्छु
क

श्री.कैलास गो.गोंधळी
श्री.गणेश गो.गोंधळी
S. K. ENTERPRISES & COMPANY
BUILDING MATERIAL SUPPLIERS, POCLAIN, JCB, DUMPER HIRE
ADD : SHOP NO. 2 & 3, PLOT NO. 251, SECTOR-19, ULWE NODE, BAMANDONGRI
NAVI MUMBAI. CONTACT : 9930779093





संकल्प असावेत नवे तुमचे
मिळाव्यात त्यांना नव्या दिशा..
प्रत्येक स्वप्न पूर्ण व्हावे तुमचे ह्याच
वाढदिवसाच्या शुभेच्छा!
18 MAY
मा. सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!
शुभेच्छुक
एक हितचिंतक





मा. सभागृह नेते, प.म.पा.
श्री. परेश ठाकूर
आपणांस
या जन्मदिनी दीर्घायुष्याच्या
अनंत शुभेच्छा !

शुभेच्छुक
KISHOR ENTERPRISES
Best Wishes From...
VIJAYAN NATRAJAN
Proprietor
+ 91 9892007290
kishoreenterprisesvijayan@gmail.com
Gala no. 5, Pavshya Complex, Next to
Balaji Industrial Complex. MIDC Taloja,
Raigad - 410 208





मा. सभागृह नेते
पनवेल महानगर पालिका
मा. श्री.
परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
Best Wishes From...
Sidhesh S. Patil
M/s. Akshra Engineers
Civil Contractors and suppliers, Bokadvira, Uran

18 MAY

माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

शु – भे – च्छु – क

प्रितम जनार्दन म्हात्रे
मा. विरोधीपक्ष नेता,
पनवेल महानगरपालिका

जे. एम. म्हात्रे
माजी नागराध्यक्ष,
पनवेल नगर पालिका

J. M. MHATRE INFRA PRIVATE LIMITED
Engineers & Conractors
J. M. Mhatre (Chairman)
Off. Market Yard Plot No. 492, Panvel - 410 206. Dist. Raigad (MS)
Tel.: (022) 2745 1625 / 2746 536 / 274559771 - 72 - 73 - 74 - 75 Fax: 27460537
E-mail: hopanvel@jmmipl.in Web: www.jmminfra.com
Resi.: At & Post Gavhan-kopar, Tal. Panvel, Dist. Raigad (MS)
Mob. 9320111111 / 9821021271

वारसा लोकहिताचा,
चेहरा नव्या पिढीचा..!

18 MAY

मा. सभागृह नेते,
पनवेल मनपा
श्री. परेश ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!

विशाल ठाकूर
राकेश म्हात्रे
राहूल म्हात्रे

शुभेच्छुक
श्री स्वामी समर्थ फ्युएल स्टेशन
इंडीयन ऑईलचे अधिकृत विक्रते
IndianOil
मुंबई गोवा हायवे, NH-66, हॉटेल सागर पॅलेस शेजारी, मु. पो. जिते, ता. पेण, जि. रायगड. ४०२१०७
E mail - shreeswamisamarth0205@gmail.com

# मातीशी
## नाळ जोडलेला नेता

पनवेल परिक्षेत्रात सतत नवनवीन उपक्रम राबवून बांधिलकी जपणारे आणि लोकाभिमुख नेतृत्वाने आपली एक वेगळी छाप उमटवणारे नाव म्हणजे महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर. त्यांनी वडील माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि मोठे बंधू आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकास क्षेत्रात योगदान दिले आहे.

पनवेलच्या समृद्ध आणि संस्कृतीप्रधान वातावरणात वाढलेले परेश ठाकूर यांनी लहानपणापासूनच समाजसेवेचे बाळकडू घेतले ते त्यांच्या वडिलांकडून. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून 'लोकांना केंद्रस्थानी ठेवून नेतृत्व' ही शिकवण त्यांनी आत्मसात केली. बंधू आमदार प्रशांत ठाकूर यांच्याही प्रभावी नेतृत्वातून प्रेरणा घेऊन त्यांनी ही शिकवण आपल्या जीवनात साकारली. हीच शिकवण त्यांच्या प्रत्येक टप्प्यात अधिक प्रगल्भ होत गेली.

आपली राजकीय क्षेत्रातील सार्वजनिक सेवा यात्रा त्यांनी नगरसेवक व महापालिकेचे पहिले सभागृह नेते म्हणून सुरू केली. त्यांनी या पदांवर कार्यरत असताना विकास योजना, पायाभूत सुविधा, नियोजन आणि लोकाभिमुख प्रशासनात ठसा उमठवला.

शिक्षण क्षेत्रातही परेश ठाकूर यांचे योगदान लक्षणीय आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि रयत शिक्षण संस्थेंतर्गत विविध शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष आणि संचालक म्हणून त्यांनी रायगड जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांना आधुनिक शिक्षण सुविधांनी समृद्ध केले अन् याद्वारे हजारो विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाची संधी दिली.

सांस्कृतिक क्षेत्रात अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी तरुण व उदयोन्मुख रंगकर्मींसाठी अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून एक भक्कम व्यासपीठ निर्माण केले आहे. सलग ११ वर्षे चालणारी ही स्पर्धा महाराष्ट्रातील नवोदित कलाकारांसाठी एक प्रेरणास्थान ठरली आहे.

क्रीडा क्षेत्रात परेश ठाकूर यांच्या दूरदृष्टीमुळे पनवेलमध्ये जिल्ह्यातील एकमेव अद्ययावत अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट अकादमीची उभारणी झाली. रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल उलवेचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी स्थानिक तरुणांना जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अथक परिश्रम घेतात. त्यामुळे स्थानिकांना क्रीडा क्षेत्रात व्यावसायिक स्तरावर पुढे जाण्यासाठी मोठी संधी मिळाली आहे.

सामाजिक उत्तरदायित्वाच्या क्षेत्रातही परेश ठाकूर यांचा ठसा अमीट आहे. कोशिश फाउंडेशन या मंचच्या माध्यमातून त्यांनी व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व विकास आणि शाश्वत जीवनशैलीसाठी प्रभावी उपक्रम हाती घेतले आहेत.

परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आमदार प्रशांत ठाकूर ट्रॉफी वक्तृत्व स्पर्धेत १७ हजारपेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले असून ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी वक्तृत्व कौशल्य आणि सजग नागरिकत्व रूजवण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरली आहे.

पर्यावरण क्षेत्रातही त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, ऑक्सि पार्क, ग्रीन पार्क, मियावाकी फॉरेस्ट यांसारख्या प्रकल्पांमुळे त्यांनी पनवेलमध्ये शाश्वत जीवन शैलीचे व नवे मापदंड निर्माण केले आहेत. परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये पायाभूत सुविधांचा झपाट्याने विकास झाला आहे. रस्ते, वीज व्यवस्था, उद्याने, जलपुरवठा योजना आणि नागरी सुविधा यामध्ये त्यांच्या दूरदृष्टीमुळे परिवर्तन घडले आहे. त्यांच्या कारभाराचा मुख्य आधार म्हणजे लोकांच्या अडचणींना समजून घेऊन लोकसहभागातून आणि शाश्वत नियोजनातून त्या सोडवण्याची त्यांची भूमिका. कुणीही त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे.

आपल्या वाढदिवसानिमित्त परेश ठाकूर यांच्या या सामाजिक समर्पित जीवनाला सलाम करीत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. तुमची प्रेरणादायी वाटचाल नव्या पिढ्यांना स्फूर्ती देवो. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**(संकलन : आयुब अकुला)**

# युथ आयकॉन

युवा नेता, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांचे द्वितीय पुत्र म्हणून प्रसिद्ध असणारे यंग जनरेशनचे आयकॉन परेशदादा ठाकूर आज समाजात विविध माध्यमातून अनेक क्षेत्रात आघाडीने व धडाडीने कार्यरत आहेत. आदरणीय रामशेठ ठाकूरसाहेबांचा आदर्श घेत समाजकारणात आपली नवी ओळख त्यांनी निर्माण केलेली आहे.

कॉलेज जीवनापासूनच समाजकारणात सक्रिय सहभाग घेणारे परेशदादा आज सामाजिक बांधिलकी जपत आपल्या वडिलांचा वारसा आपल्या आमदार असणारे भाऊ आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून पुढे नेण्याचे काम करीत आहेत.

आम्हाला माहिती असणारे परेशदादा हे समाजकारणी नव्हे, तर शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणारे असे संचालक मंडळातील एक जबाबदार व्यक्तिमत्व म्हणून आहेत. शाळेतील अनेक उपक्रमांमध्ये असणारा त्यांचा सक्रिय सहभाग विद्यार्थ्यांबरोबरच शाळेचाही दर्जा उंचावण्याचे काम करीत आहेत.

अगदी तळागाळातील विद्यार्थी हासुद्धा एक उत्तम वक्ता झाला पाहिजे, किमान चार शब्द त्याला सभागृहात बोलता आले पहिजेत या भावनेतून त्यांनी कोशिश फाउंडेशनची स्थापना केली. 'कोशिश'च्या माध्यमातून गेली काही वर्षे ते पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तसेच रायगड जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये विविध स्पर्धा यशस्वीपणे राबवित आहेत.

यशस्वी उद्योजकाबरोबरच ते सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यातही अग्रेसर आहेत. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत त्यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रातील अनेक करिअर दालने खुली करून दिली आहेत. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणारे विद्यार्थीही केवळ या कारणासाठी मागे राहू नयेत, त्यांच्यातील कलागुणांना वेळीच वाव मिळावा या हेतूने परेशदादा नवनवीन संकल्पना राबवित असतात. अटल करंडक, खारघर मॅरेथॉन, क्रिकेट, कबड्डी, खो-खो, लंगडी अशा अनेक स्पर्धा तसेच नाट्य स्पर्धा, बालनाट्य शिबिर असे कित्येक उपक्रम सुरू केले आहेत.

आमच्या सीकेटी इंग्रजी माध्यमिक विभागात परेशदादांच्या मार्गदर्शनाने 'बोलक्या भिंती' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येतो. गेल्या सात-आठ वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थ्यांना अज्ञात असणाऱ्या अनेक ऐतिहासिक विषय, व्यक्ती, स्थान याबद्दलची माहिती जाणून घेता येते आणि त्यांच्या ज्ञानात भर पडते.

असा हा समाजासाठी झटणारा, पनवेलमधील सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणारा, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा, तरुणांचा आदर्श युवा नेता, एक युवा आयकॉन आहे. माननीय परेशदादा ठाकूरसाहेब आपणांस सीकेटी संकुलाच्या सर्व शिक्षकांच्या वतीने वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-प्रगती शैलेश जाधव,**
**सहाय्यक शिक्षिका,**
**सीकेटी विद्यालय,**
**नवीन पनवेल**

# निमित्त
# 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!'चे
## आठवण मी शिवाजीराजे भोसले बोलतोयची

महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने महेश मांजरेकर यांनी पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाची घोषणा ही गोष्ट आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल मिडियातून सर्वदूर पोहचली आहेच. महाराष्ट्र फक्त महाराजांनाच ऐकतो, म्हणूनच पुन्हा शिवरायांची महाराष्ट्राला गरज आहे, असे सांगत महेश मांजरेकर यांनी या चित्रपटाचा सामाजिक आणि भावनिक गाभा स्पष्ट केला.

हे माझ्या महाराष्ट्राचं भविष्य आहे. यांच्या भावनांशी खेळलात, तर याद राखा... गाठ माझ्याशी आहे. या शिवगर्जनेच्या सोबतीने 'पुन्हा शिवाजीराजे भोसले!' या चित्रपटाचा उद्देश स्पष्ट होतो. हा केवळ ऐतिहासिक चरित्रपट न राहता आधुनिक महाराष्ट्राला त्याच्या मूळ विचारांकडे परत नेण्याचा प्रयत्न असून हा सिनेमा ऐतिहासिक व्यक्तिरेखेचा गौरव करतानाच आजच्या समाजातील निष्क्रियतेला जाबही विचारणार आहे.

या सिनेमात छत्रपती शिवाजी महाराज ही महत्त्वपूर्ण भूमिका सिद्धार्थ बोडके साकारणार आहे. महेश मांजरेकर यांचे दिग्दर्शन, कथा लेखन असलेल्या या चित्रपटाचे संवादलेखन सिद्धार्थ साळवी यांचे आहे. चित्रपटाची निर्मिती राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध करत आहेत. चित्रपटाच्या आशयात नेमके कोणते सामाजिक वा राजकीय विषय हाताळले जाणार हे सध्या गुप्त ठेवण्यात आले आहे, मात्र महाराष्ट्रच या सिनेमाच्या कथेचा मध्यवर्ती केंद्रबिंदू असणार आहे. आजच्या महाराष्ट्रातील मूलभूत प्रश्नांवर चित्रपटात भाष्य करण्यात येणार आहे, जे प्रश्न गेल्या काही दशकांपासूनही अनुत्तरितच आहेत.

सिद्धार्थ बोडके आपल्या भूमिकेविषयी बोलतो ही केवळ भूमिका नाही, तर एक जबाबदारी आहे. याआधी अनेकांनी महाराजांची भूमिका साकारली असून आता ती जबाबदारी माझ्यावर आहे. ती योग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी मी प्रयत्नशील आहे,

या निमित्ताने संतोष मांजरेकर दिग्दर्शित मी शिवाजीराजे भोसले बोलतोय (२००९) या चित्रपटावर एक फ्लॅशबॅक...आणखी काही मजकूर देतोय

...'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय'च्या दिग्दर्शनाच्या वेळी संतोष मांजरेकरला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिरेखेतील महेश मांजरेकर यांच्या घोडेस्वारीचा अतिशय उत्तम रितीने सदुपयोग करायचा होता. चित्रपटाचे काही प्रमाणात चित्रीकरण झाल्यावर अंधेरी विलेपार्ले यांच्या दरम्यान एस.व्ही. रोडवर असलेल्या लता कुंज या बंगल्यात सचिन खेडेकर, महेश मांजरेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यावर काही दृश्ये चित्रीत करायची ठरले. सकाळी साडेसहा वाजताची शिफ्ट ठरली. छत्रपती शिवाजी महाराज आणि रायबा हे घोड्यावरून दिनकर भोसले यांच्या घरी पहिल्यांदा पहाटे भेटायला येतात असे दृश्य चित्रीत करायचे होते. पहिल्या दिवशी पाऊस पडला म्हणून त्या दिवशीचे हे शूटिंग रद्द केले आणि दुसरा दिवस नक्की केला. पुन्हा सकाळी खूपच लवकर शूटिंग सुरू झाले. महेश मांजरेकरना घोडेस्वारी ज्ञात असल्याने त्यांना वेगळ्या सूचना द्यायच्या नव्हत्या. मकरंद अनासपुरे यांच्याऐवजी डमी वापरायचे ठरले. हे दोघे साधारणपणे चार पाच घरे ओलांडून दिनकर भोसले यांच्या इमारतीत शिरतात असे दृश्य घ्यायचे होते. त्यानुसार कॅमेरा आणि सगळे युनिट तयार होते. दिग्दर्शकाने स्टार्ट म्हणताच दोन्ही घोडे चालू लागले. महेश मांजरेकर यांनी लगाम चांगला पकडला होता आणि मागच्या डमीनेही भान ठेवले होते, पण लता कुंजवरचा कॅमेरा बघून घोडे बावचळले, महेश मांजरेकर यांनी लगाम खेचला आणि अशातच बंगल्यापूर्वीच्या इमारतीत घोडे शिरताच गोंधळ उडाला आणि त्यात ते दोन्ही घोडे पडले, महेश मांजरेकर यांचे डोके फूटपाथच्या कडेला आपटले आणि ते काही काळ बेशुद्ध झाले. त्यातच मागील घोड्याचा पाय महेश मांजरेकर यांच्या गालाला लागली. नेमके काय होतेय हे महेश मांजरेकर यांच्या लक्षात यायला वेळ लागला, पण तोपर्यंत दिग्दर्शकाने शूटिंगच रद्द केले. एकूणच गोंधळातून सावरताच महेश मांजरेकरने दिग्दर्शक संतोष मांजरेकरला सतत विचारले, तू शूटिंग का रद्द केले? सेटवरच्या या अपघातातून उभे राहून आपण शूटिंग करायला हवे. तोपर्यंत दिग्दर्शकाने दिनकर भोसले गच्चीतून पब्लिकशी बोलतोय हे दृश्य चित्रीत केले आणि त्यातील गर्दीचे शूटिंग दहिसरच्या एका बंगल्याबाहेर चित्रीत केले आणि मग त्या दोन्ही दृश्ये जोडून घेतली, पण महेश मांजरेकर यांनी या अपघातातून सावरत शूटिंग केले आहे. विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गेटअपमध्ये शिरताच महेश मांजरेकर यांना काही वेगळे तेज येत असे. एक नवीन उर्जा प्राप्त होत असे आणि ती या चित्रपटाच्या पत्थ्यावर पडली.

'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' अगदी घोषणेपासूनच चर्चेत होता. प्रभादेवी येथील रवीन्द्र नाट्य मंदिर येथे या चित्रपटाचा झालेला भव्य मुहूर्तच सकारात्मक वातावरणात झाला. या वेळी राज्याचे तात्कालिक सांस्कृतिकमंत्री अशोक चव्हाण आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे अध्यक्ष राज ठाकरे हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' हे नाव महेश मांजरेकरनाच सुचले आणि संवाद लेखक संजय पवारनेही हेच नाव परफेक्ट असल्याचे म्हटले. दिनकर भोसले सचिन खेडेकरच साकारणार हे अगोदरच निश्चित झाले आणि या चित्रपटातील विविध व्यक्तिरेखा कोणाला द्यायच्या हेदेखील अगोदर निश्चित करीत तशी आखणी व कार्यवाही केली गेली. 'एखाद्या कलाकाराला घेऊन मग त्याला काढ' असे या चित्रपटाबाबत अजिबात झाले नाही. मुहूर्तापासूनच एक प्रकारचे असलेले झपाटलेपण चित्रपटाच्या पत्थ्यावर निश्चित पडेल असाच विश्वास होता.

...आणि जेव्हा हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा, काही काही चित्रपट प्रेक्षक असे काही डोक्यात आणि अगदी डोक्यावर घेतात की ते चित्रपट पडद्यावरच राहत नाहीत तर ते समाजाचा एक महत्त्वाचा भाग बनतात. अश्वमी फिल्म्सचा संजय छाब्रिया निर्मित आणि संतोष मांजरेकर दिग्दर्शित 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' हा चित्रपटही अगदी तस्साच. २००९ सालचा हा चित्रपट अगदी आजही तितकाच प्रभावी वाटतो यात बरेच काही आले. महेश मांजरेकर आणि अभिजित देशपांडे यांची अतिशय उत्तम बांधणी असलेली पटकथा आणि संजय पवार यांचे जोरदार संवाद तसेच सचिन खेडेकरने साकारलेली दिनकर भोसले ही व्यक्तिरेखा अशा अनेक घटकांतून हा चित्रपट विलक्षण प्रभावी ठरला. लता कुंज हा बंगला दिनकर भोसले यांचे घर म्हणून दाखवायचा हे त्याची मूळ रचना पाहून आणि त्यात आवश्यक तसे बदल करीत नक्की केले.

दिनकर भोसले हा मुंबईतील चाळीत राहणारा अतिशय स्वाभिमानी आणि सरळमार्गी असा मध्यमवर्गीय मराठी माणूस. तो एकीकडे मुंबईवरील परप्रांतीयांच्या वाढत्या आक्रमण आणि त्यांच्या वृत्तीला कंटाळलाय. त्याला रोजच्या धकाधकीच्या जीवनात याचे चटके बसताहेत. तर दुसरीकडे मराठी माणूस आपल्या स्वभावात बदल करीत नाही, तो आपल्या परंपराना चिकटून बसला आहे याचा त्याला राग आहे. अशा कोंडीत तो सापडला असतानाच छत्रपती शिवाजी महाराज त्याच्या मदतीसाठी प्रगटतात आणि दिनकर भोसलेचा लढाऊ बाणा जागा होतो अशा मध्यवर्ती कथासूत्रावर हा चित्रपट रंगला. अतिशय रोखठोक, धारदार, जोरदार संवाद या चित्रपटाची सर्वात मोठी ताकद ठरली. विशेष म्हणजे मुंबई असो, महाराष्ट्रात कुठेही असो, अगदी दुबई, लंडन, अमेरिका असे कुठेही असू देत या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आगमनाच्या वेळी जय भवानी जय शिवाजी असा नारा घुमलाय. पब्लिक अगदी उसळून यायचा. या चित्रपटाची क्रेझ अशी विलक्षण रूजली. चित्रपटात हर हर महादेव आणि हे राजे जीर जीर जी या गाण्यांचा अतिशय उत्तम रितीने वापर केला असल्याने चित्रपट अधिकाधिक रंगतदार होत गेला. विशेष म्हणजे हे राजे जीर जीर या गाण्याचे पहिलं शूटिंग पूर्णपणे रद्द करुन पुन्हा एकदा नव्याने करायचे ठरले. खरंतर महेश मांजरेकर दिग्दर्शित चित्रपट असो अथवा निर्मित असो, एकदा का पटकथा निश्चित झाली की त्यात कसलाही बदल करायचा नाही हे पहिल्या चित्रपटापासून आजपर्यंत चालत आले आहे. कधी रिशूटींग नाही, कधी पॅचअप नाही, पण या पोवाड्यासंदर्भात अपवाद ठरला. या पोवाड्याच्या शूटिंगवर त्या वेळी एक कोटी रुपये खर्च केले. महाबळेश्वर आणि काही भाग गोरेगावच्या दादासाहेब फाळके नगरीत शूटिंग करायचे ठरले आणि वाढत्या बजेटचा विचार न करता आपल्या चित्रपटाची थीम अधिकाधिक रंगतदार आणि प्रभावीपणे पडद्यावर यायला हवी असाच विचार केला आणि तो अमलातही आणला.

सचिन खेडेकरने टिपीकल पारंपरिक मध्यमवर्गीय मराठी माणूस उत्तम रितीने साकारलाय. मराठी माणसाचा अभिमान/स्वाभिमान/संकोच/कुचंबणा/त्रागा/लढाऊ वृत्ती असे अनेक घटक सचिन खेडेकरने उत्तम रितीने साकारले. या चित्रपटाच्या यशानंतर सचिन खेडेकरला अगदी याच पठडीतील तब्बल पस्तीस भूमिका ऑफर झाल्या, पण त्याने त्या नाकारल्या.

काही काही लोकप्रिय चित्रपट फक्त आणि फक्त पडद्यावर राहत नाहीत तर त्यांचा असा प्रभाव पडतो. पुन्हा शिवाजीराजे भोसले या चित्रपटाच्या निमित्ताने असे थोडे मागे वळून पहायलाच हवे.



झूम प्रहर

दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

# क्रिकेटप्रमाणे राजकारणातही अनिश्चितता

## मंत्री भरत गोगावले यांचे प्रतिपादन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

क्रिकेट खेळामध्ये ज्याप्रमाणे कोणत्या क्षणी बाजी पलटते; त्याप्रमाणे राजकारणातदेखील अनिश्चितता असून कधी विरोधात असलेले आपल्याकडे येतात, तर आपल्याकडे असलेले विरोधात जातात किंवा आपल्याकडे राहूनही विरोध करतात, अशी फटकेबाजी रोजगार हमी योजना, खार जमीन, फलोत्पादनमंत्री भरत गोगावले यांनी केली.

पोलादपूर तालुक्यातील देवळे ते जांभुळवाडी रस्त्याचे भूमिपूजन आणि पोलादपूर तालुका ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष निलेश कोळसकर यांच्या शिवसेना पक्षप्रवेशावेळी ना. गोगावले बोलत होते.

व्यासपीठावर देवळे सरपंच सुनीता मेस्त्री, तालुका प्रमुख निलेश अहिरे, सहसंपर्क प्रमुख चंद्रकांत कळंबे, विभाग प्रमुख रवी केसरकर, अनिल दळवी, शहर प्रमुख सुरेश पवार, तानाजी निकम, प्रकाश जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण मोरे, रायगडभूषण बंडा घाडगे, अभिनेते हरीओम घाडगे, संतोष भोसले, सुभेदार नारायण केसरकर, उपसरपंच किसन रिंगे, राघूबुवा रिंगे, वसंतबुवा केसरकर, विजय शेलार, उपतालुकाप्रमुख कृष्णा नरे, कापडे विभागप्रमुख कृष्णा कदम, चरई सरपंच संदेश कासार, नारायण साने, विठ्ठल पार्टे, रमेश मोरे, प्रसाद साने, राजेश डांगे. महादेव खोपकर, भागोजी कोंढाळकर, चित्रेवाडीतील सखाराम पवार, राजेश महामुनी आदी उपस्थित होते.

या वेळी कोळसकर यांच्यासह तुकाराम केसरकर, विनायक केसरकर, राजन पवार, विनायक चित्रे, शंकर केसरकर, दीपक पार्टे, गणेश उतेकर, विठ्ठल दळवी, दत्ता दळवी, विलास उत्तेकर, माया कोळस्कर, मंगेश जाधव तसेच चित्रेवाडी, जांभुळवाडी, करंजे, केवनाळे, फासेवाडी आणि अन्य भागातील ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले.

दहावीच्या परीक्षेत ९० टक्केपेक्षा अधिक गुण मिळणारे विद्यार्थी सिद्धेश संतोष रिंगे, अमेय महादेव पवार व किक बॉक्सिंग विजेती खेळाडू श्रावणी शैलेश कोळसकर यांचा मंत्री गोगावले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कोस्टल महामार्गामुळे कोकणात पर्यटकांचा ओघ वाढणार

## खासदार सुनील तटकरे यांचा विश्वास

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य शासनाचा कोस्टल महामार्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या महामार्गात प्रवास अधिक जलद होण्यासाठी समुद्री भागात पूल बांधल्यामुळे प्रत्येक तालुक्यातील अंतर कमी होऊन प्रवास जलद होईल. त्यामुळे येत्या तीन ते चार वर्षात कोकणात पर्यटकांची संख्या चौपट पटीने वाढून स्थानिक नागरिकांना मोठा स्वयंरोजगार प्राप्त होणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी केले.

मुरूड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीत जिल्हा नियोजन मंडळातून सात लाख रुपये खर्च करून व्यायामशाळेतील साहित्याचे लोकार्पण करण्यात आले. या सोहळ्याच्या उद्घाटन समारंभात खासदार तटकरे बोलत होते.

व्यासपीठावर राष्ट्रवादी अलिबाग मुरूड चणेरा विधानसभा अध्यक्ष अमित नाईक, आगरदांडा ग्रामपंचायत सरपंच आशिष हेदुलकर, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, सचिव विजय पैर, शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, मनोज भगत, माजी सरपंच अजित कासार, माजी सभापती अशिका ठाकूर, महिला तालुका अध्यक्ष ॲड. मृणाल खोत, अल्पसंख्याक अध्यक्ष मुश्रत उल्डे, संतोष पाटील, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, मेहबूब उल्डे, माजी सभापती स्मिता खेडेकर, ग्रामपंचायत सदस्य युसुफ अर्जबेगी उपस्थित होते.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते व्यायामशाळेची फीत कापून उद्घाटन करण्यात आले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, सध्या पर्यटनचा ओघ वाढत असून रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व मुरूड तालुक्यात सर्वाधिक पर्यटक येत आहेत. कोस्टल हायवेमुळे कोकणात पर्यटक संख्या वृद्धिंगत होऊन स्थानिक लोकाचा आर्थिक स्तर उंचवण्यात मदत होणार आहे. आगरदांडा ते तूरबंदी पुलाचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी प्रयत्नशील आहे. कोकणात कोणताही रासायनिक कारखाना येऊ देणार नाही.कोकणातले सौंदर्य हे अप्रतिम असून ते टिकवून ठेवण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.

कोकणातील मुले-मुली इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून कोकणाचे नाव उज्वल करीत आहेत. कोकणातील मुलांची बुद्धिमत्ता स्पर्धा परीक्षेतसुद्धा चमकावी यासाठी स्पर्धा परीक्षेचे विशेष क्लास व मार्गदर्शन त्यांना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असून आम्ही यासाठी रोहे शहरात विशेष नियोजन केल्याचे या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

गतिमान जीवनशैली असल्याने व्यायाम करणे खूप आवश्यक असून आगरदांडा येथील व्यायाम शाळेचा येथील निवासी लोकांनी आवश्यक लाभ घ्यावा व आपले आरोग्य सदृढ ठेवावे, असे आवाहन खासदार तटकरे यांनी केले. कार्यक्रमासाठी स्थानिक लोक उपस्थित होते.

# रायगडात ३ जूनपर्यंत ड्रोन आणि अन्य हवाई उपकरणांवर बंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर यशस्वी कारवाई केल्यानंतर, संभाव्य बदला घेण्याच्या दृष्टीने दहशतवादी संघटनांकडून ड्रोनचा वापर वाढल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून रायगड जिल्ह्यात १७ मे ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन व तत्सम उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३मधील कलम १६३ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा आदेश लागू केला आहे. या आदेशानुसार रायगड जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी तसेच आजूबाजूच्या परिसरात ड्रोन, रिमोट कंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडिंग, पॅरामोटर्स, हँग ग्लायडर्स आणि हॉट एअर बलून यांच्या उड्डाणास सक्त मनाई करण्यात आली आहे. हा आदेश पोलीस अधीक्षक, रायगड यांच्या शिफारशीनुसार आणि कायदा व सुव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने घेण्यात आला आहे.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता २०२३च्या कलम २२३ अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे. नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून कोणतीही शंका असल्यास संबंधित पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# सुधागडात अनधिकृत माती उत्खननावर कारवाई

## २२ लाख ८३ हजारांचा दंड वसूल

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यात बेकायदेशीर माती उत्खननावर प्रशासनाने कारवाई करून २२ लाख ८३ हजारांचा दंड वसूल केला आहे. याबाबत तहसीलदार उत्तम कुंभार यांनी सर्व मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांना सखोल चौकशीचे आदेश दिले.

चौकशीत सुधागड तालुक्यात १३ अनधिकृत उत्खनन प्रकरणे उघडकीस आली आणि त्यानुसार कारवाई करण्यात आली. याबाबत माहिती देताना तहसीलदार कुंभार यांनी सांगितले की, तालुक्यात १३ अनाधिकृत उत्खनन प्रकरणांवर २२ लाख ८३ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे तसेच एप्रिल २०२५पासून रॉयल्टी वसुली २१ लाख रुपये करण्यात आली असून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एक कोटी ८७ लाख रुपयांची रॉयल्टी वसुली करण्यात आली आहे.

सध्या तालुक्यात अनधिकृत उत्खनन किती ठिकाणी सुरू आहे याची तपासणी केली जात असून अनाधिकृतपणे उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही तहसीलदार कुंभार यांनी स्पष्ट केले.

# पेण आरटीओ कार्यालय येथे जप्त वाहनांचा २७ मे रोजी ई-लिलाव

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पेण यांच्या वतीने मोटार वाहन कायदा १९८८ व मुंबई मोटार वाहन कर नियम १९५८ अन्वये जप्त करण्यात आलेल्या ६० वाहनांचा ई-लिलाव २७ मे रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा लिलाव महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये कराधान प्राधिकाऱ्यांना प्राप्त अधिकारांचा वापर करून घेण्यात येत आहे.

ई-लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुकांनी ३४ हजार नोंदणी शुल्क (ना परतावा) आणि चार लाख ९४ हजार ठेव रक्कम (परतावा) DDद्वारा Dy RTO PEN या नावाने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे भरावयाची आहे. लिलावाची सविस्तर माहिती व अटी http://www.eauction.gov.in या संकेतस्थळावर १६ मेपासून उपलब्ध आहे. ई-लिलाव २७ मे रोजी दुपारी १२ ते २ वाजता होईल. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, पेण यांनी कोणतेही कारण न देता लिलाव रद्द अथवा तहकूब करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. इच्छुकांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचून व अटी-शर्तींची पूर्तता करून लिलावात सहभागी व्हावे, असे आवाहन आहे.

**ई-लिलावाचे वेळापत्रक**
नोंदणी सुरुवात : २० मे सकाळी १० वा.
नोंदणी समाप्ती: २१ मे दुपारी ५ वाजता
कागदपत्र पडताळणी व मंजुरी : २२ मे सकाळी ११ वाजता

**वाहने पाहणीची वेळ**
सुरुवात : १७ मे सकाळी १० वाजता
शेवट : २५ मे सायंकाळी ६ वाजता

**ई-लिलावाचे वेळापत्रक**
नोंदणी सुरुवात : २० मे सकाळी १० वा.
नोंदणी समाप्ती: २१ मे दुपारी ५ वाजता
कागदपत्र पडताळणी व मंजुरी : २२ मे सकाळी ११ वाजता

# माथेरानच्या शारलोट तलाव संवर्धन कामाला गती

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ब्रिटिश कालीन शारलोट तलावाचे संवर्धनाचे काम राज्य सरकारच्या मुख्यमंत्री तलाव सुशोभीकरण योजनेतून सुरू असून तलावातील गाळ काढण्याचे आणि तलाव मजबूत करण्याचे काम माथेरान नगरपालिकेकडून नेमलेल्या ठेकेदार यांच्या माध्यमातून करून घेत आहे.

शारलोट तलाव स्वच्छतेसाठी माथेरानवासीयांकडून मागील अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. आता या कामाला खरी सुरवात झाली असून माथेरानवासीयांचा पिण्याच्या पाण्याचा साठा वाढणार असून येथे स्वच्छ पाणी मिळणार आहे.

माथेरान पर्यटनस्थळ ब्रिटिशांनी शोधले होते. त्यावेळी ब्रिटिशांनी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी याकरिता शारलोट तलाव बांधला. माथेरानमधील हा शारलोट तलाव पिण्याच्या पाण्याचे दृष्टीने खूप महत्त्वाचा लेक आहे. या तलावाच्या स्वच्छतेचे काम माथेरान पालिकेमार्फत केले जात असे, मात्र मागील दहा वर्षांपासून हा शारलोट तलाव

गाळातच अडकून राहिला होता.

पूर्वी दरवर्षी पावसाळा सुरू झाल्यावर पालिका सफाई कामगार तलावातील गाळ काढण्याचे काम करीत होते. त्यानंतर २०१४मध्ये डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने हजारो श्री सदस्यांच्या माध्यमातून शारलोट तलावाची संपूर्ण स्वच्छता केली होती. तेव्हापासून अजूनपर्यंत दहा वर्षांचा कालावधी लोटला तरीसुद्धा माथेरान नगरपालिकेकडून तलावाची स्वच्छता, साफसफाई झालेली नाही.

मागील दोन वर्षांपूर्वी तलाव स्वच्छ करण्याची तारीख निश्चित करण्यात आली होती, मात्र नवी मुंबई महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाने आडकाठी केल्यानंतर ऐन पावसाळ्यात शारलोट तलावातील गाळ काढण्याचे काम रद्द झाले होते. त्या वेळी माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेकडून तलाव स्वच्छतेसाठी आवाज उठवण्यात आला होता तसेच उपोषणदेखील करण्यात आले होते. त्या उपोषणाच्या वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संबंधित तलावातील गाळ काढण्याच्या आणि तलावाचे संवर्धन करण्याच्या कामाला मंजुरी मिळाली असल्याचे येथे सांगितले होते. आता या कामाला खरी सुरुवात झाली असून शारलोट तलाव संवर्धनाच्या कामाला गती मिळत आहे.

**“माथेरान पर्यटन व्यवसायासाठी पुरेसा पाणीपुरवठा महत्त्वाचा असून पाण्याची उपलब्धता मोठी असल्यास येथील पर्यटन व्यवसायातही यामुळे मोठी वाढ होऊ शकते. तलाव स्वच्छतेवेळी निघणाऱ्या मातीचा उपयोग परिसरातील झाडांना करावा. तलाव स्वच्छतेमुळे पुढे कमीत कमी दोन महिन्यांच्या अतिरिक्त पाण्याचा साठा या ठिकाणी वाढणार आहे.**
**-संतोष कदम, अध्यक्ष,** माथेरान निसर्ग पर्यटन संस्था

# पारगाव संघाने सोयरे चषक जिंकला

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुरूड तालुक्यातील काशिद येथे डिसिबी ग्रुप आयोजित सोयरे चषक क्रिकेट स्पर्धा रंगली. या स्पर्धेत सिद्धेश वॉटर सप्लायर्स पारगाव-पनवेल या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत २४ संघानी सहभाग घेतला होता. गाव टू गाव प्रत्येक संघात दोन आयकॉन खेळाडूंचा समावेश होता. द्वितीय क्रमांक एस.जे. टायगर संघ अलिबाग, तर संस्कार स्पोर्ट्स सर्वे संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्यासह जिल्हा नियोजन समिती सदस्य संतोष निगडे, निलेश घाटवळ, भाजप जिल्हा

सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, शिवसेना मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, रोहा तालुका प्रमुख ॲड मनोजकुमार हिंगे, राष्ट्रवादी काँग्रेस अलिबाग व मुरूड विधानसभा संघटक अमित नाईक, संपर्क प्रमुख चंद्रकांत मोहिते, बोर्ली सरपंच सपना जायपाटील, तळेखार सरपंच विजय घाणेकर, गैरिनाथ कटोर, शैलेश काटे, अमोल लाड, विकी वेगस आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे व काशिद ग्रामपंचायत सरपंच संतोष राणे यांनी केले.

मालिकावीर म्हणून सुमित डोंगरे, उत्कृष्ट फलदांज मृणाल वरसोलकर, उत्कृष्ट गोलदांज सोहम खोपकर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रितेश पाटील यांची निवड करण्यात आली. विजेते संघ व विशेष कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे मुख्य आकर्षण असलेली बैलजोडी प्रथम क्रमांक विजेत्या पारगाव संघाचे मालक विकी खोपकर यांना प्रदान करण्यात आली.

# आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा

**रोहे : प्रतिनिधी**

एसव्हीआरएसएस रायगड व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने रोह्यात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आणि बचाव कार्यक्रमासाठी तीन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचा शुभारंभ नगर परिषदेचे माजी गटनेते महेंद्र गुजर व युवा नेते रवी चाळके यांच्या हस्ते करण्यात आले. हे प्रशिक्षण शिबिर १६, १७, १८ मे रोजी कोलाड येथे आयोजित करण्यात आले आहे.

तीन दिवस चालणाऱ्या शिबिरात अग्निशमन प्रशिक्षण, गिर्यारोहण बचाव, पाण्याच्या पुरापासून बचाव याचे अन्य आपत्कालीन घटनेच्या वेळी उपयुक्त असलेले प्रशिक्षण देण्यात येणार आहे तसेच रोह्यातील कुंडलिका नदी येथे बचाव कसा करावे याचे प्रशिक्षण शनिवारी सकाळी सुरू करण्यात आले. आपत्कालीन समयी उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीमध्ये कशा पद्धतीने काम करावे यासाठी विशेष प्रशिक्षण या वेळी देण्यात येत आहे.

# नागोठणे उर्दू हायस्कूलमध्ये बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुणपत्रकाचे वाटप

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे उर्दू हायस्कूलच्या इयत्ता बारावी आर्ट्स व कॉमर्सच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शनिवारी (दि. १७) नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या उर्दू हायस्कूलचे संस्थापक सेक्रेटरी लियाकत कडवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणपत्रक वाटप करण्यात आले.

शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला कडवेकर यांच्या समवेत उर्दू हायस्कूलचे संचालक शब्बीर पानसरे, सागीर अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक अतिक अन्सारी, शिक्षिका आशिया अलिखान खान व विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी कडवेकर म्हणाले की, आजच्या युगात शैक्षणिक संस्था चालवणे फार कठीण झाले असले तरी आम्ही संचालक मंडळ पदरमोड करून नागोठणे एज्युकेशन सोसायटीची उर्दू हायस्कूल चांगल्या प्रकारे चालवित आहोत याचा

**पुढील वर्षी अकरावी, बारावी सायन्स वर्ग**

आमच्या उर्दू हायस्कूलमध्ये अकरावी व बारावी सायन्सचे शिक्षण नसल्यामुळे विध्यार्थ्यांना फारच अडचण सोसावी लागत आहे. ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी सायन्स शाखेत प्रवेश घ्यायायचा आहे त्यांना नाईलाजाने इतर शाळेत प्रवेश घ्यावा लागत आहे. त्यामुळे पुढील वर्षी (सन २०२६-२७) आम्ही आमच्या उर्दू हायस्कूलमध्ये इयत्ता अकरावी व इयत्ता बारावी सायन्स शाखेचे वर्ग सुरु करणार असल्याचे लियाकत कडवेकर यांनी सांगितले.

मला सार्थ अभिमान आहे. या वर्षी आमच्या उर्दू हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून इयत्ता बारावी कॉमर्सचा निकाल ८६.९५ टक्के व आर्ट्सचा निकाल ५० टक्के लागला आहे.

# नवी मुंबईत आज ई-कचरा संकलन उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

ई-कचरा अर्थात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा कचरा वेगळा संकलित करण्याकडे ही नवी मुंबई महापालिका आयुक्ता डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष देण्यात येत आहे.

ई-कचरा संकलनासाठी महापालिकेमार्फत वेगळे वेळापत्रक बनविण्यात आले असून रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी नवी मुंबई आणि थ्रेको कंपनी यांच्या सहकार्याने, ई-वेस्ट रिसायकलींग मोहीम हा अभिनव उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. बहुतांशी नवी मुंबईकर नागरिकांनाही दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ई-कचरा संकलित करण्यात येतो याची माहिती झाली असून आपल्या घराजवळून ई-कचरा संकलित केल्या जाणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ही ई-वेस्ट संकलन मोहीम व्यापक स्वरूपात राबविली जात आहे. ई-वेस्ट संकलनासाठी महानगरपालिकेच्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवरून जारी करण्यात आलेल्या क्यू आर कोडव्दारे अथवा गुगल लिंकमधील फॉर्मवर आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व आपल्याकडील ई-कच-याची माहिती नोदविल्यास आपल्याकडील ई-वेस्ट (इलेक्ट्रॉनिक कचरा) गोळा करण्यासाठी आपण दिलेल्या पत्त्यावर अगदी दरवाजापर्यंत वाहन येऊन ई-वेस्ट संकलित केले जाते. इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची सुरक्षित आणि जबाबदारीने विल्हेवाट लावणे व त्याचे व्यवस्थापन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून रविवार, दि. १८ मे २०२५ रोजी ही ई-वेस्ट संकलन मोहीम राबविण्यात येत आहे.

## बसथांब्यांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका प्रशासनाकडून बसथांब्यांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह अत्याधुनिक पद्धतीचे निवारा शेड उभारले जात आहेत. बसथांब्यावर ओला-सुका कचरापेट्यांसह एलईडी लाइटची सोय असणार आहे. सीसीटीव्हींमुळे गैरप्रकारांना आळा बसणार असल्यामुळे खारघरसह पालिका हद्दीतील प्रवाशांतून समाधान व्यक्त करीत आहे.

खारघर तसेच बेलापूर रेल्वेस्थानकावरून एनएमएमटी बस खारघर आणि तळोजा परिसरात येजा करीत असतात. तळोजा, खारघर वसाहतीमधील रहिवाशांना मुंबई, ठाणे आदी भागात रेल्वेने प्रवास करण्यासाठी खारघर रेल्वेस्थानक एकमेव स्थानक आहे. खारघर रेल्वेस्थानकावरून खारघर आणि तळोजा वसाहतीत प्रवास करणारे प्रवासी मोठ्या प्रमाणात आहेत. रेल्वेस्थानकाबाहेर एकमेव निवारा असल्यामुळे अनेक प्रवाशांना बस पकडण्यासाठी उन्हात थांबावे लागत आहे तसेच खारघर वसाहतीमधील अनेक बसथांबे मोडकळीस आले आहेत.

## उरणमध्ये गणपती मंदिरात संकष्ट चतुर्थीनिमित्त गर्दी

**उरण :** संकष्ट चतुर्थी शुक्रवारी होती. यानिमित्त उरण शहरातील गणपती चौक येथील गणपती मंदिरात भक्तांनी सकाळपासूनच लाईन लाऊन दर्शन घेतले. सकाळी ६.३० वाजता अभिषेक व पूजा करण्यात आली.

मंदिरातील मूर्ती ३०० वर्षांपूर्वीची आहे असे सांगण्यात येत आहे दररोज सकाळी ७ वाजता व सांयकाळी ७.३० वाजता महाआरती केली जाते. अंगारक, संकष्ट व मंगळवारी सायंकाळी ७.३० वाजता महाआरती केली जाते. अंगारकी, संकष्टी व मंगळवारी या दिवशी मंदिरासमोर दुर्वाचे हार, नारळ, फुलांचे हार यांची दुकाने थाटण्यात येतात. उरण बाजारपेठेत येणारे नागरिक गणपतीचे दर्शन घेऊच बाजारपेठेत जातात. दिवसेंदिवस भक्तांची दर्शनासाठी गर्दी वाढत आहे.



# मोहोपाडा परिसरात मान्सूनपूर्व सफाई कामांना वेग

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मोहोपाडा, आळी आंबिवली, खाने आंबिवली, रिस, नवीन पोसरी, दुर्गामाता वसाहत, गणेशनगर, रिस आदी परिसरात मुख्य नाल्याच्या साफसफाईचे काम सुरू केल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

वासांबे-मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील मोहोपाडा हे परिसरातील बाजारपेठेचे केंद्र आहे. पावसाळ्यापूर्वी या नाल्यांची साफसफाई करणे आवश्यक असल्याने सरपंच उमा संदीप मुंढे, प्रभारी सरपंच भुषण पारंगे, सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्य प्रतीक्षा रोशन राऊत, सदस्य आकाश अमृत जुईकर, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांच्या प्रयत्नातून मोहोपाडा परिसरातील नालेसफाईच्या कामांना वेग आला आहे.

वासांबे (मोहोपाडा) ग्रुप ग्रामपंचायतीकडून जेसीबी लावून मोहोपाडा अचानक मैदान, पंचशिलनगर ते पल्स मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल नाल्यातील कचरा आणि वाहून आलेली माती साफसफाई केली जात आहे तसेच मोहोपाडा गावातील नालेसफाईलाही वेग आला आहे.

मोहोपाडा मासळी बाजारानजीकच्या मैदानावर टाकाऊ कचरा टाकणाऱ्या विक्रेत्यांना नोटीस देण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी बोलताना सांगितले.

5) पै.सौरभ पाटील (सीकेटी,पनवेल) X पै.अजित मदने (सातारा)
6) पै.निखिल कदम (सीकेटी,पनवेल) X पै.प्रतिक भंडारी (भिवंडी)
7) पै.विजय म्हात्रे (सापार्डे) X पै.भावेश साळवी (काकडवाल)
8) पै.शुभम वळखडे (कामोठे) X पै.प्रेम पाटील (हेडुटणे)
9) पै.संतोष भोसले (पुणे) X पै.दयानंद पाटील (कलंबोली)
10) पै.जयेश साळवी (काकडवाल) X पै.अविनाश शेळके (कलंबोली)
11) पै.आसपाक तांबोळी (सोलापूर) X पै.अविनाश शिंदे (पुणे)
12) पै.प्रदीप सावंत (कळंबोली) X पै.जय भंडवे (कोल्हापूर)
13) पै.कुलदीप पाटील (कोल्हापूर) X पै.राकेश कुमार(मुंबई)
14) पै.साजण पावशे (नितळस) X पै.निलशा कदम (कर्जत)
15) पै.सुरज पालकर (कोल्हापूर) X पै.आकाश दुबे (पुणे)
16) पै.सौरभ हगवणे (सातारा) X पै.मूनाल पाटील (कोल्हापूर)
17) पै.स्वस्तिक वाकडे (चौदरपाडा) X पै.करण देसाई (कोल्हापूर)
18) पै.प्रतिक हातमोडे (गिरवले) X पै.पंकज जोशी (कर्जत)
19) पै.विशाल पुजारी (खारघर) X पै.आकाश भोसले (सातारा)
20) पै.चेतन शेळके (पाली) X पै.विवेक माली (कर्जत)
21) पै.सुमित ठाकरे (हेडुटणे) X पै.विनायक पॉल (खारघर)
22) पै.सुजित मदने (सातारा) X पै.द्यानेश्वर महाजन (चाळीसगाव)
23) पै.साई चौधरी (चौधरपाडा) X पै.सौरभ जाधव (सातारा)
24) पै.रियान पटाण X पै.निखिल जाधव (सातारा)
25) पै.ओमकार गायकर X पै.प्रज्योत भंडारी (चौधरपाडा)
26) पै.रोशन धुले (कर्जत) X पै.राज म्हात्रे (आतार्ली)
27) पै.आकाश शर्मा X पै.तेजस भंडारी (चौधरपाडा)
28) पै.अजित कुदले (कोल्हापूर) X पै.राज पाटील (खादागाव)
29) पै.नवनाथ सुतार (चौधरपाडा) X पै.विजय धुले (कर्जत)
30) पै.किरण ढवळे (शिवकर) X पै.कुशल पाटील (नाहैंन)
31) पै.उमेश पाटील (पिसार्वे) X पै.प्रदिप ढवले (शिवकर)
32) पै.ऋतिक वाकडे (एलकुंदे) X पै.प्रेम साळवी (काकडवाल)
33) पै.रोहिदास पाटील (अबिवली) X पै.अमेदंई कनौजीया (पिसार्वे)
34) पै.दुर्वश म्हात्रे (नादिवली) X पै.सार्थक गोधली (नितलस)
35) पै.वैदात ठाकरे (ठाकुरपाडा) X पै.संस्कार शिदे (कलंबोली)
36) पै.महेंद्र साळवी (काकडवाल) X पै.संकेत कुभार (खोपोली)
37) पै.हर्षद कालण (हेडुटणे) X पै.नवनाथ गगनमले (कलंबोली)
38) पै.माया गोधळी (बामार्ली) X पै.पार्थ माने (कलंबोली)
39) पै.आकाश सांगळे (नितलस) X पै.सुरत झॉ (नावडे)
40) पै.ओमकार साळुंखे (पुणे) X पै.रोशन धूले (कर्जत)
41) पै.सनी आजारी (उसाटणे) X पै.तुषार माली (कर्जत)
42) पै.श्रुतीक पाटील (उसाटणे) X पै.सूरज जोशी (कर्जत)
43) पै.वैदात येलकर (कळंबोली) X पै.शिवसुंदर शाहू (खारघर)
44) पै.समर्थ जाधव (भाईंदर) X पै.ओम शिंदे (कलंबोली)
45) पै.कुंदन पोतेकर (शिरडून) X पै.हितेंद्र मडवी (उसळणे)
46) पै.स्वप्निल लावंड (कळंबोली) X पै.कामत्या पवार (भाईंदर)
47) पै.दर्शन वाहिले (नांदिवली) X पै.सुरज जाधव (भाईंदर)
48) पै.अंकुश गायकवाड (नांदिवली) X पै.तनिष मडवी (उसाटणे)
49) पै.सुजल सहाने (नावडे) X पै.आदर्श शिंदे (भाईंदर)
50) पै.चिराग गायकवाड (पनवेल) X पै.माऊली करे (पुणे)
51) पै.तन्मय मडवी (उसाटणे) X पै.साहिल डोलतरे (कलंबोली)
52) पै.निखिल यादव (कलंबोली) X पै.दीपक सरोज (भाईंदर)
53) पै.प्रणय पाटील (कोनगाव) X पै.वेदांत पाटील (रोहिंजन)
54) पै.निखिल भोपी (रिटघर) X पै.जीत भोईर (कोनगाव)
55) पै.भुषण पवार (पिसार्वे) X पै. निखिल जोशी (कर्जत)
56) पै.चैतन्य ठाकरे (ठाकूर पाडा) X पै.सिद्धार्थ भोपी (नितलस)
57) पै.विकास भाऊ (नावडे) X पै. प्रज्वल पाटील (कलंबोली)
58) पै.सुमित वीरकर (कळंबोली) X पै.स्वस्तिक गायकवाड (नांदिवली)
59) पै.सुजित म्हात्रे (पिसार्वे) X पै.सुजित बोडके(कर्जत)
60) पै.अमन प्रजापती(नावडे) X पै.श्रवण पाटील (पिसर्वे)
61) पै.मानव यादव (कलंबोली) X पै.आरव मेमाने (भाईंदर)
62) पै.शुभम म्हात्रे (नांदिवली) X पै.करण भोई (उसाटणे)
63) पै.सुरज हजारी (नारेन) X पै.शुभम संत्रे (कलंबोली)
64) पै.आयुष पाटील (कलंबोली) X पै.दीपराज फुलोरे
65) पै.अभिषेक शाहू (नावडे) X पै.महेश ढगे (भाईंदर)
66) पै.शुभम गौतम (नावडे) X पै.सुजल दरे (नितलस)
67) पै.अमन साहू (नावडे) X पै.आधी पाटील (कोनगाव)
68) पै.सार्थक साळुंखे (नांदिवली) X पै.साई परदेशी (भाईंदर)
69) पै.आधी थोरात (नांदिवली) X पै.भावेश गोदे (कलंबोली)
70) पै.सुशील पावशे (नितलस) X पै.अर्णव शेजूळ (कलंबोली)

**महिला कुस्ती**

01) पै.रितिका कारंडे (खांदा कॉलनी) X पै.समृद्धी लोबी (कर्जत)
02) पै.सानिका संत्रे (कलंबोली) X पै.कोमल पटेल (भाईंदर)
03) पै.स्नेहा येवले (कलंबोली) X पै.स्नेहा भल्ला (भाईंदर)
04) पै.पूर्वा कोळेकर (कलंबोली) X पै.कविता राजभर (भाईंदर)

टीप : जोडलेल्या कुस्तीयाच्या व्यतिरिक्त आखाड्यात एकही कुस्ती लावली जाणार नाही

कुस्ती निवेदक - परशुराम पवार सांगली , हलकी सम्राट - संभाजी बाबा हलगी ग्रुप इस्लामपूर पंच रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन व पनवेल तालुका कुस्तीगीर संघ - बळीराम पाटील , राजेश भोईर , योगेश लहाने विनोद नाईक , गजानन हातमोडे , अशोक पाटील , सावलाराम पायमोडे , जयराम गवते , राम मस्कर , संजय पाटील , ज्ञानेश्वर भोईर , विश्वनाथ भोपी ,बच्चू पवार , जगदीश पवार , भूषण हातमोडे , बबन पवार , राम ठाकूर , समाधान आडके , दिलीप पाटीलप्रविण भोपी , मुकुंद मढवी , गणेश पाटील , प्रज्वलदीप ढोणे , संपत्ती येलकर , विलास पाटील , प्रतिज्ञा भोईर , विकास वळीकर , रुपाली शिंदे , बरकत सैख ,

संपर्क

श्री.तेजस जाधव - 9594945089 / श्री.प्रवीण कोरडे - 9773753455 / श्री.अजय मोरे - 9930382060 / श्री.रुपेश पावसे - 9594639297

स्थळ : लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय, सेक्टर ६, कामोठे.

नव्या दिशाने, नव्या विचाराने,
पाउल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने,
तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!
माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री.
परेश
ठाकूर
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
18
MAY
TIPL
शु | भे | च्छु | क
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
Tel. : 022 27452713, 9769409120
Email : thakurinfraprojects@gmail.com
Web : www.thakurinfraprojects.in